cmyk

## संपादकीय

### जातिभेदाचे उग्र चटके !

समाजात जातिभेदाचे राजकारण जोरात सुरु असतांना, निश्चय केला तर दहा वर्षात लोकांच्या मनातून जातिभेद नष्ट करणे शक्य असल्याचा आशावाद राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख सरसंघचालक मोहन भागवत यांनी नुकताच व्यक्त केला. जात समाजाच्या तळागाळात रुजली आणि भेदाभेदाचे कारण बनली. भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी जातिभेद नष्ट करावा लागेल.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२६५ गुरूवार दि.२२ जानेवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### शक्तिपीठ महामार्गावरून शेतकऱ्यांत संभ्रम

कोल्हापूर : नागपूर–गोवा शक्तिपीठ महामार्गाचे भूत पुन्हा एकदा जिल्ह्याच्या मानगुटीवर बसले असून, सध्या या प्रकल्पावरून समर्थकांचे मोर्चे आणि विरोधकांचे दावे यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. आधी तीव्र विरोध, मग मुख्यमंत्र्यांकडून मार्ग बदलण्याचे आश्वासन आणि आता पुन्हा 'जुनाच मार्ग हवा' म्हणून निघालेला मोर्चा, या चक्रव्यूहात नेमके काय होणार, या चिंतेने बाधित शेतकरी ग्रासले आहेत. महामार्ग नक्की कोणत्या गावातून आणि कोणाच्या शेतातून जाणार, या बाबत अद्यापही स्पष्टता नाही. जुना मार्ग रद्द झाल्याची चर्चा असतानाच, आता पुन्हा जुन्याच मार्गासाठी मोहोळमध्ये मोर्चे निघू लागल्याने, नक्की मार्ग बदलला की बदलणार आहे, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. तसेच आता या महामार्गाचे समर्थक विरुद्ध बाधित असा नवा संघर्ष उफाळला आहे. मोहोळमध्ये माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चाने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### सोने १ लाख ६० हजारांवर; चांदीत तेजी कायम

जळगाव : गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे सोने अन् चांदीच्या किमतीत उच्चांकी वाढ नोंदवण्यात आली आहे. जळगावच्या सराफ बाजारामध्ये सोन्याच्या आणि चांदीच्या दरामध्ये सलग तिसऱ्या दिवशी प्रचंड मोठी वाढ झाली. सोन्याच्या दरामध्ये तब्बल ७ हजार ५०० रुपयांची तर चांदीच्या दरामध्ये तब्बल दहा हजार रुपयांची वाढ नोंदवण्यात आली. सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख ५९ हजार ६५० रुपयांच्या तर चांदीचे दर ३ लाख ३२ हजार ६५० रुपयांच्या ऐतिहासिक उच्चांकीवर पोहोचले आहेत. सलग तीन दिवसांपासून सोन्या आणि चांदीच्या दरामध्ये तेजी असून दराने आजपर्यंतचे विक्रम मोडले आहेत.

### लिव्ह–इन मधील महिलांना पत्नीचा दर्जा द्या–हायकोर्ट

मदुराई : आधुनिक काळात लिव्ह–इन रिलेशनशिपच्या जाळ्यात अडकलेल्या महिलांना विवाहाप्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांमध्ये महिलांना पत्नीचा दर्जा दिला जाऊ शकतो, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने नोंदवले आहे. तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील एका व्यक्तीने अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. तक्रारदार महिलेच्या मते, संबंधित व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले आणि नंतर लग्नास नकार दिला. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळून लावला. न्यायमूर्ती एस. श्रीमती यांनी सुनावणी करताना भारतीय परंपरेतील गंधर्व विवाहाचा संदर्भ दिला. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. यामध्ये कोणत्याही विधींशिवाय केवळ परस्पर प्रेम आणि संमतीने होणाऱ्या गंधर्व विवाहाचा समावेश आहे. आजच्या काळातील लिव्ह–इन रिलेशनशिपला याच दृष्टिकोनातून पाहता येईल, जेणेकरून महिलांना असहाय्य सोडले जाणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

### बँक कर्मचाऱ्यांचा मंगळवारी देशव्यापी संप

मुंबई : देशभरातील बँक कर्मचाऱ्यांचा ५ दिवसाचा आठवडा करावा या मागणीसाठी देशव्यापी संप मंगळवारी (दि.२७) होणार आहे. या संपादिवशी मुंबई शहरातील बँक कर्मचारी आझाद मैदानात सकाळी ११ वाजता एकत्रित जमून सरकार व बँक प्रशासनाच्या विरोधात महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशन निदर्शने करणार आहे, अशी माहिती फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी देवीदास तुळजापुरकर यांनी दिली. २०१० ला बँकर्सनी पाच दिवसांचा आठवडा ही मागणी तत्वत: मान्य करत असताना दोन शनिवार अर्ध्या दिवसांची सुट्टी रद्द करून उर्वरित दोन शनिवार पूर्ण सुट्टी लागू केली. त्यानंतर ११ व्या द्विपक्ष करारात पुन्हा ही मागणी तत्वतः मान्य करत उर्वरित दोन दिवसांच्या सुट्टीचा प्रस्ताव सरकारला सादर केला जाईल असे मान्य केले. १२ व्या द्विपक्ष करारात पुन्हा ही मागणी मान्य करत शिफारशी सह अंमलबजावणीसाठी हा प्रस्ताव सरकारला सादर केला जाईल असे सांगितले. तसा तो प्रस्ताव सरकारला सादर केला. पण दोन वर्षांपासून सरकारने अंमलबजावणीत चालढकल केली.

# ई-पीक पाहणीचे शेवटचे तीन दिवस शिल्लक

## नोंदणी न केल्यास सातबाऱ्यावर पिकाचा रकाना कोरा, मदत मिळण्यास अडचण

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील रब्बी हंगामातील पिकांची अधिकृत नोंद व्हावी यासाठी शासनामार्फत ई-पीक पाहणी मोहिम राबविण्यात येत असून, सर्व शेतकऱ्यांनी २४ जानेवारीपर्यंत पिकांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण करणे बंधनकारक आहे. ठरलेल्या मुदतीत नोंद न झाल्यास सातबाऱ्यावर पिकाचा रकाना कोरा राहणार असून, त्यामुळे भविष्यात पीक विमा तसेच नैसर्गिक आपत्तीच्या मदतीपासून शेतकरी वंचित राहण्याची शक्यता आहे.ङ्गमहसूल विभागाने यासाठी 'ई-पीक पाहणी ४.०.५' हे नवीन मोबाइल ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन, शेताच्या बांधावरूनच या ॲपद्वारे पिकांची माहिती अपलोड करायची आहे. यामुळे सातबाऱ्यावर अचूक नोंद होऊन संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येणार असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.ङ्गज्या शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल उपलब्ध नाही किंवा ॲप वापरताना तांत्रिक अडचणी येत आहेत, त्यांच्यासाठी तलाठी, कोतवाल किंवा गावात नियुक्त मदतनीसांमार्फत ई-पीक पाहणी नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे कोणताही शेतकरी नोंदणीपासून वंचित राहू नये, असे आवाहन महसूल प्रशासनाने केले आहे.



### यासाठी नोंदणी आवश्यक

अवेळी पाऊस, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास मदत मिळवण्यासाठी पिकाची नोंद असणे अनिवार्य आहे. नोंदणी न केल्यास सातबारा कोरा राहतो आणि लाभ घेताना अडचणी निर्माण होतात.

# शिंदे सेनेचा भाजपला धक्का!

## मनसेसोबत सत्तास्थापनेची तयारी; कल्याण डोंबिवलीत राजकारण फिरले

मुंबई । प्रतिनिधी

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सत्तास्थापनेच्या रस्सीखेचात शिंदेंच्या शिवसेनेने भाजपला बाजूला ठेवून मनसेच्या साथीने सत्तास्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. खुद्द खासदार श्रीकांत शिंदे यांनी याबाबतची माहिती पत्रकारांना दिली आहे. मनसेचे पाच आणि शिवसेनेचे ४ नगरसेवक हे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मनसेने आधीच पाठिंबा दिला आहे.**



कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिवसेनेने (शिंदे गट) ५३ जागा जिंकल्या आहेत. तर मनसे आणि ठाकरेंची शिवसेना यांचे मिळून ९ नगरसेवक आहेत. या दोघांची बेरीज ही ६२ पर्यंत पोहचत आहे. दरम्यान, कोकण भवनात खासदार श्रीकांत शिंदे, मनसे नेते राजू पाटील, नरेश म्हस्के यांची बैठक झाली. या बैठकीनंतर एकानाथ शिंदे यांचे सुपूत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी कल्याण – डोंबिवलीत मनसे शिवसेनेला पाठिंबा देत आहे. आम्ही सर्वजण मिळून सत्ता स्थापन करणार आहोत. ठाकरेंच्या नगरसेवकांनी आम्हाला पाठिंबा दिला तर बरे होईल, असे सुचक वक्तव्य त्यांनी केले. श्रीकांत शिंदे प्रतिक्रिया देताना पुढे म्हणाले, भाजप आणि आमच्यात कोणतीही चढाओढ नाही. आम्ही मिळून सत्ता स्थापन करत आहोत. लवकरच कुणाचा महापौर आणि कोणाचा उपमहापौर होईल हे स्पष्ट होईल. श्रीकांत शिंदे यांनी विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे मनसे नेते राजू पाटील

▶▶ पान २ वर

# मनरेगा' मुद्द्यावर काँग्रेसचा देशव्यापी संवाद; राहुल गांधी करणार मार्गर्शन

दिल्ली । वृत्तसंस्था

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) कमकुवत केली जात असल्याचा आरोप करत काँग्रेसने या मुद्द्यावर देशव्यापी संवाद आयोजित करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमात देशभरातील मनरेगा कामगार आपल्या–आपल्या कार्यस्थळावरून मुठभर माती घेऊन सहभागी होणार आहेत, असे काँग्रेसने बुधवारी स्पष्ट केले.**

काँग्रेस जयराम रमेश यांनी सांगितले की, मनरेगा बचाओ मोर्चा अंतर्गत राष्ट्रीय परिषदेचे



गुरुवारी आयोजन करण्यात आले असून, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी या परिषदेला संबोधित करणार आहेत. परिषदपूर्व तयारीचा भाग म्हणून देशभरातील कामगार त्यांच्या कामाच्या ठिकाणाहून माती घेऊन दिल्लीत येत असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी बोलताना काँग्रेसचे नेते संदीप दीक्षित यांनी आरोप केला की, भाजप सरकार मनरेगाऐवजी लोकांचे हक्क हिरावून घेणारे नवीन कायदे आणत आहे आणि त्यामुळे या योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. कोविड काळात मनरेगा कोट्यवधी लोकांसाठी जीवनरेखा ठरली होती आणि या योजनेतून ग्रामीण भागात रस्ते, शाळा, पंचायत इमारती, तलाव आणि पाणी साठवण प्रकल्प

▶▶ पान २ वर

## शिरूर तालुक्यात कापूस वेचणाऱ्या महिलेवर बिबट्याचा हल्ला

शिरूर कासार



**शिरूर कासार तालुक्यातील रूपूर शिवारातील गट क्रमांक २५ मध्ये मंगळवारी दुपारी बिबट्याने कापूस वेचणाऱ्या एका महिलेवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. यामुळे परिसरात दहशत पसरली आहे.**

विठाबाई शिवराम नेटके (वय ५५) असे जखमी महिलेचे नाव असून, त्या स्वतःच्या शेतात कापूस वेचण्याचे काम करत होत्या. त्यावेळी अचानक बिबट्याने त्यांच्यावर झडप घालून हल्ला केला. या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. बचावासाठी त्यांनी आरडाओरड करत प्रतिकार केला. महिलेने केलेल्या विरोधाने बिबट्याने डरकाळी फोडत घटनास्थळावरून पळ काढला.

▶▶ पान २ वर

# बायकोनेच रचला कट

## निर्व्यसनी नवरा व्यसनमुक्ती केंद्रात

बीड । प्रतिनिधी

**कोणतेही व्यसन नसताना एका ग्रामसेवकाला त्यांच्या पत्नीने संगनमत करून चक्क व्यसनमुक्ती केंद्रात डांबून ठेवल्याचा खळबळजनक प्रकार बीड शहरात उघडकीस आला आहे. केवळ मालमत्ता हडपण्यासाठी आणि आर्थिक वादातून हा कट रचल्याचा आरोप पीडित पतीने केला असून, याप्रकरणी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी आणि मानवी हक्क आयोगाकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे. तक्रारदार हे पेशाने ग्रामसेवक आहेत.**

चार अनोळखी व्यक्ती आल्या. तुम्हाला शिवाजी नगर पोलीस ठाण्यात बोलावले आहे, असे

▶▶ पान २ वर

### कायदेशीर हस्तक्षेप आणि सुटका

पीडिताच्या भावांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे धाव घेतली. प्राधिकरणाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे पीडित ग्रामसेवक व्यक्तीची त्या केंद्रातून सुटका झाली. सुटका करण्यापूर्वी संबंधित केंद्राने त्यांच्याकडून बळजबरीने १६,४०० रुपये फी म्हणून वसूल केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे आपले शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान झाले असून, केंद्राचे संचालक आणि पत्नीवर कठोर कारवाई करण्याची मागणी पीडिताने दिलेल्या लेखी तक्रारीत केली आहे.

## कृषी प्रदर्शनाहुन येताना बीडच्या दोन तरुण शेतकऱ्यांचा अपघातात मृत्यू

बीड । प्रतिनिधी

**शेतीमध्ये काहीतरी नवीन प्रयोग करावा, पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड द्यावी या जिद्दीने बारामती येथील कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी गेलेल्या दोन तरुण शेतकऱ्यांचा परतीच्या प्रवासात भीषण अपघात झाला. मिरजगाव परिसरात झालेल्या या अपघातात दोन्ही तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, आष्टी तालुक्यातील वनवेवाडी, मातकुळी गावावर शोककळा पसरली आहे.**

श्रीकांत नानासाहेब खांबकर (वय २०) आणि महेश आप्पासाहेब खांबकर (वय २२) हे दोन्ही तरुण बारामती येथे आयोजित करण्यात आलेले भव्य कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी दुचाकीवरून गेले होते. दिवसभर प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेटी देऊन, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेऊन ते त्याच दिवशी रात्री आपल्या गावाकडे परतत होते. रात्रीच्या सुमारास जामखेड–श्रीगोंदा रोडवरील मिरजगाव जवळ एका पुलावर त्यांची दुचाकी आली असताना, समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांना जोराची हूल दिली. या गोंधळात दुचाकीवरील

▶▶ पान २ वर

## राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज

### ढगाळ हवामानामुळे राज्यातील थंडीत चड उतार

पुणे । प्रतिनिधी

**उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम असला तरी ढगाळ हवामानामुळे राज्यातील किमान तापमानात पुन्हा काहीशी वाढ दिसून आली आहे. गुरूवारी राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.**

राज्यातील अनेक ठिकाणी तापमानात वाढ दिसून आली. ढगाळ हवामान झाल्याने किमान तापमान वाढून थंडी कमी झाली आहे. राज्यातील सर्वच ठिकाणी किमान तापमान १० अंशाच्या पुढे आहे. उत्तर महाराष्ट्रासह मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील तापमानात वाढ दिसून आली आहे. यामुळे थंडीचा कडाका कमी होऊन दुपारी चांगलाच उकाडा जाणवत आहे. राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागात ढगाळ हवामानाचीही शक्यता वर्तविण्यात आली आहे. उद्या खानदेशातील

▶▶ पान २ वर

# २४ लाख महिलांची चुकिने सरकारी कर्मचारी म्हणून नोंद

## लाडकी बहिण योजनेची मदत थांबली, महिला आणि बाल कल्याण विभागाने चूक मान्य केली

मुंबई । प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेच्या ई–केवायसी प्रक्रियेतील सदोष चुकीमुळे राज्यातील २४ लाखांहून अधिक महिला लाभार्थींना चुकीने सरकारी कर्मचारी म्हणून वर्गीकृत करण्यात आले, यामुळे त्यांची मासिक आर्थिक मदत अचानक थांबवण्यात आली आहे. महिला आणि बाल कल्याण विभागाने ही चूक मान्य केली असून, आता या लाभार्थींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी राज्य सरकारने

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १५.५० क्विंटल | २,४५० | २,७११ | २,५९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | २,१०१ | ४,२१० | ३,१४६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ७१.५० क्विंटल | ५,०१० | ७,५०० | ७,१७७ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ४,००० | ४,९०१ | ४,४५० |
| बाजरी: २६.०० क्विंटल | २,००० | ३,३५६ | २,८२६ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: ६०.०० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,५०१ | ४,५०१ | ४,५०१ |

# बीडच्या सुपुत्राचा दावोसच्या जागतिक आर्थिक परिषदेत डंका !

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान; वर्षभरात ५०० कोटींच्या उद्योग उभारणीबद्दल कौतुक

बीड । प्रतिनिधी

**दावोस येथे सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) बीड जिल्ह्यातील परळीचे सुपुत्र आणि 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी जागतिक स्तरावर आपली ठळक छाप उमटवली. गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गीते यांचे दावोसमध्ये विशेष कौतुक केले.**

सामंजस्य करार कागदापुरते न राहता एका वर्षात प्रत्यक्षात उतरू शकतात, याचे भरत गीते हे उत्तम उदाहरण आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी



काढले. फडणवीस यांच्या हस्ते गीते यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी अन्य देशांचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी येथे उभारण्यात आलेल्या 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग उत्पादन प्रकल्पाने अल्पावधीतच उत्पादन सुरू करून राज्यासमोर आदर्श औद्योगिक मॉडेल उभे केले असल्याचे मुख्यमंत्री

▶▶ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# जातिभेदाचे उग्र चटके !

समाजात जातिभेदाचे राजकारण जोरात सुरु असतांना, निश्चय केला तर दहा वर्षात लोकांच्या मनातून जातिभेद नष्ट करणे शक्य असल्याचा आशावाद राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख सरसंघचालक मोहन भागवत यांनी नुकताच व्यक्त केला. जात समाजाच्या तळागाळात रुजली आणि भेदाभेदाचे कारण बनली. भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी जातिभेद नष्ट करावा लागेल. त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले तर विशिष्ट कालमर्यादेत उद्दिष्टपूर्ती शक्य आहे, असेही ते म्हणाले. भागवत यांनी अत्यंत जटील समस्येला थेट हात घातला आणि त्यावर व्यापक भूमिका घेतली, त्याचे समाज स्वागत करेल. कारण जातिभेदाचे उग्र चटके सामान्य माणसांना सहन करावे लागतात. हे भेद इतके खोलवर रुजले आहेत की, त्या अस्मितेपोटी अनेक माणसे त्यांच्या पोटच्या गोळ्याचा जीव घ्यायला देखील मागेपुढे पाहात नाहीत.

जातिबाह्य विवाह आजही व्यापक पातळीवर समाजसंमत नाहीत. जातिभेदाच्या भीषण परिणामांचे हे एक उदाहरण आहे. बाकी परिणामाची यादी मोठीच असू शकेल. जातिभेद सोडून द्या असे सगळेच सांगतात. सर्व संतांनी तरी वेगळे काय सांगितले? 'संतू म्हणे जाती दोनच त्या आहे. स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे..' असे संत जगनाडे महाराज म्हणतात. जातिभेद नको असे राजकारणी म्हणतात. जाती मानू नका असे सामान्य माणसे म्हणतात. सामाजिक संघटना त्याचाच पुनरुच्चार करतात. पण त्यासाठीची कालमर्यादा भागवत यांनी घालून दिली हे महत्वाचे आहे. उद्दिष्टपूर्तीसाठी कालमर्यादा आवश्यक असते. संघाचे कोट्यवधी स्वयंसेवक आहेत. संघाचा जागतिक विस्तार देखील झाला आहे. संघाच्या सेवाकार्याचे अनेक दाखले अधूनमधून दिले जातात. अशा संघटनेचे प्रमुख जेव्हा उपरोक्त आवाहन करतात, तेव्हा त्याला सखोल अर्थ असतो. त्यांचे बोल त्यांच्या अनुयायांसाठी अनमोल असतात. ते भागवत यांचे आवाहन निश्चितपणे मनावर घेतील अशी लोकांची अपेक्षा आहे.

संघ शताब्दी वर्ष साजरे करत आहे. या वर्षात संघ अनेक कार्यक्रम राबवताना आढळतो. अनेक प्रमुख मुद्यांवर काम करत असल्याचे स्वयंसेवक सांगतात. जातिभेद निर्मूलनासाठीचा कालबद्ध कार्यक्रम संघ हाती घेईल अशी आशा प्रगतिशील लोकांच्या मनात पल्लवित झाली असेल. सामान्य माणसांना बदल हवा असतो. तथापि, त्याचे निमित्त बनण्याचे धाडस सगळीच माणसे दाखवू शकत नाहीत. किंबहुना, त्याची सुरुवात दुसर्या कोणीतरी करावी अशीच भूमिका अनुभवास येते. तसे घडले तर सामान्य माणसे बदलकर्त्याच्या-संघटनेच्या मागे उभे तर राहातातच; पण ते बदल अंगीकारण्याचा मनापासून प्रयत्न देखील करतात. संघाचा विस्तार हे त्याचे चपखल उदाहरण ठरू शकेल. जातिभेदाचा मुद्दा देखील त्याला अपवाद नसू शकेल. संघाच्या पातळीवर असा कार्यक्रम सुरू झाला तर लोक देखील तो स्वीकारण्याची शक्यता कैक पटीने बळावू शकेल. नव्हे, संघाची कार्यपद्धती लक्षात घेता तसा उपक्रम तयार देखील असू शकेल. तथापि, राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांचे काय? संघशक्तीमुळे ज्यांना सत्ता मिळाली असे बोलले जाते, ते भागवत यांच्याइतकी व्यापक भूमिका घेऊ शकतील का, हा खरा प्रश्न आहे.

राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना जातिभेद प्रवाहात सामील करून घेण्याचे मोठेच आव्हान ठरू शकेल. कारण जातिभेदाशिवाय राजकारण शक्य नाही असा ठाम समज सगळ्याच पक्षांचा आढळतो. निवडणुकीच्या राजकारणात जाती अत्यावश्यक घटक असल्याचे लोक अनुभवतात. किंबहुना, उमेदवारीसाठी जात हा आवश्यक निकष बनला आहे यात कोणाचेही दुमत नसावे. त्यालाच जातीपातीचा समतोल विचार असे गोंडस नाव हेच पक्ष बहाल करतात. ज्या मनातून जात हद्दपार करण्याचे स्वप्न भागवत बघतात, त्याच मनामनात जात खोलवर रुजवण्यात राजकीय पक्ष आघाडीवर असतात. परिणामी जे नेत्यांच्या मनात, त्याचीच री कार्यकर्ते ओढतात. पण आता हा गुंता भागवत म्हणजेच संघ नक्की सोडवू शकेल. कारण सत्ताप्राप्तीसाठी अपरिहार्य घटक मानल्या जाणार्या संघाशी पंगा कोण घेऊ शकेल? त्यामुळे भागवत यांनी केलेले आवाहन काही काळानंतर लोकांच्या अनुभवास येण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही.

# जालना बसस्थानकासमोरील लॉजवर छापा

## रंगिल सहा पुरषांना आटक, ८ पीडीत महिलांची सुटका

**जालना । प्रतिनिधी**

२१ जानेवारी रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की बसस्टॅन्ड रोड वरील बॉबी लॉजींग अॅण्ड बोर्डींग येथे लॉज मालक हे स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी त्यांच्या बॉबी लॉजमधे बाहेरुन महीलांना आणुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्या वरुन सदर माहीती बाबत मा. पोलीस अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या आदेशाप्रमाणे परीवीक्षाधीन पोलीस अधिक्षक जानवी शेखर व स्थागुशाचे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता, बॉबी लॉज येथे आरोपी बॉबी लॉजचे मालक (फरार) २) मॅनेजर बाबुलाल रामदास भटकर वय ४४ वर्ष रा. आसरा ता. भातकोली जि. अमरावती ३) गजानन दत्ता खेडवे वय ३१ वर्ष रा. अंजनी बु ता. मेहकर जि. बुलढाणा ४) भरत उत्तम काळे वय ३२ वर्ष रा. पळसखेड ढोबरी ता.



भोकरदन जि. जालना ५) तुकाराम विलास पोतेकर वय २० वर्ष रा. तनवाडी ता. घनसावंगी जि. जालना ६) मिनाज सुलतान अहेमद वय ३० वर्ष रा. जिन्सी रोड रमनासपुरा ता. जि. छ.संभाजीनगर असे ०८ पीडीत महीलांसह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यात रोख ६३,९३०/-असा मुद्देमाल मिळुण आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे सदरबाजार येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, परीवीक्षाधीन पोलीस अधिक्षक जानवी शेखर, यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोउपनि संजय गवळी, पोहेकों कृष्णा देठे, महिला पोलीस हेडकॉन्सटेबल संगिता चव्हाण, पुष्पा खरटमल, महीला पोलीस अमलदार आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस हेडकॉन्सटेबल संजय कुलकर्णी व पोस्टे सदर बाजार येथिल पोहेको रामप्रसाद रंगे, पोकों राहुल कटकम व आर.टी.पी.सी पोकों शुभम राठोड व चालक मापोकों चित्रा चव्हाण यांनी केलेली आहे.

# खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

**खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या.**

यावेळी व्यासपीठावर प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती कोमल कोरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी शहरी एन. डी. वामन यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, अभ्यासासोबतच



खेळ, चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्यकला यांसारख्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये कल्पकता, आत्मविश्वास, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळांमधून शिस्त, संयम व सहकार्याची भावना रुजते, तर कलेतून भावना व्यक्त करण्याची क्षमता वाढते.आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांचा ताण कमी करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले. पालक व शिक्षकांनी मुलांच्या आवडीनिवडी ओळखून त्यांना खेळ व कलेच्या माध्यमातून स्वत:ला व्यक्त करण्यासाठी संधी द्यावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले. पोलीस मुख्यालयाच्या मैदावर दिनांक १९ ते २१ जानेवारी या दरम्यान चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात जिल्हयातील शासकीय व स्वयंसेवी बालगृहातील मुलांनी सहभाग घेतला होता. या तीन दिवसीय महोत्सवामध्ये मैदानी खेळामधे कब्बडी, १०० मी. धावणे, गोळा फेक, थाळी फेक, लिंबु-चमचा, पोत्यामधुन चालने तसेच इनडोअर खेळामध्ये - कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच आज दिनाक २१ जानेवारी रोजी मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणुन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये विद्याथ्यांने एकल गायन, समूह गायन, नृत्या कला मध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमामध्ये सर्व विजेत्यांना व सहभागी विद्याथ्यांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# जगदंबा भजनी मंडळाचा हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न

**मंठा । प्रतिनिधी**

सध्याच्या डिजिटल युगात सुद्धा नारी महिला शक्ती आपले सण आपल्या परंपरा जपताना सध्या दिसत आहेत. अशाच प्रकारची परंपरा संक्रांत या सणाच्या निमित्ताने मंठा येथील ब्राह्मण गल्लीतील जगदंबा महिला मंडळाने जपली आहे या मंडळाने घरोघरी हळदीकुंकू ठेवण्यापेक्षा एकत्र येऊन सर्व महिलांनी संक्रांतीचे वाण लुटण्याचा कार्यक्रम येथील गणपती मंदिरात केला यावेळी सर्व महिलांनी एकाच रंगाच्या साड्या पोशाख परिधान केला होता यामुळे सर्व महिलांनी आपल्या एकीचे दर्शन घडविले असून शहरातील प्रत्येक महिलांना बोलावून हळदीकुंकू दिले.महीलांनी परंपरेनुसार वेळ आणि पैसा वाचून आपले वाण लुटण्याचा कार्यक्रम केला. या उपक्रमामध्ये विशेष म्हणजे या महिलांनी संक्रांत सण पंढरपूर येथे जाऊन विठ्ठल रुक्मिणी मंदिरात साजरा केला होता. खास करून या महिला स्वत:च गेल्या होत्या या महिला सध्या विविध उपक्रम राबवत असून सामाजिक उपक्रमांमध्ये भाग घेत आहे विशेष करून आपली गल्ली आपला रस्ता कसा स्वच्छ राहील हे देखील या महिला आवर्जून पाहत असतात जगदंबा भजनी मंडळानी केलेल्या उपक्रमाची सर्व मंठा शहरांमध्ये चर्चा होताना दिसत आहे.

# अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाची कामगिरी

## पळवुन नेलेल्या २ पिडीत मुलीचा व आरोपीचा पोलिसांनी शोध लावला

जालना । प्रतिनिधी

दोन पळून नेलेल्या मुली व आरोपीचा शोध सांगली आणि सोलापुर जिल्हया मध्ये लावण्यात आला. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाकडे तपासावर असलेल्या गुन्हयांपैकी पोलीस स्टेशन सेवली येथे दिनांक २७/०३/२०२३ रोजी तक्रारदार विजय धर्मा राठोड व्य. मजुरी रा. वझर सरकटे ता. मंठ यांनी पोस्टेला तक्रार दिली की, त्यांच्या अल्पवयीन मुलीस त्यांच्याच गावातील आरोपी नामे महादेव जनार्धन मुसळे याने फुस लावुन पळवून नेलेले आहे. वगैरे तक्रारी वरुन पोस्टे सेवली येथे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयात पोस्टे स्तरावर तपास करण्यात आला परंतु गुन्हयातील आरोपी व पिडीता मिळुन न आल्याने गुन्हयाचा पुढील तपास वरीष्ठांच्या आदेशाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष जालना यांच्याकडे देण्यात आला होता.

प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष जालना यांनी सदर गुन्हयात पिडीत व आरोपीचा शोध घेण्याच्या दृष्टीकोनातुन झाल्या तपासाच्या कागदपत्राचे अवलोकन करुन प्रकरणात आरोपी व पिडीताची माहिती मिळविण्या करिता गुप्तबातमीदार नेमुन मिळालेल्या माहितीवरुन आरोपीच्या मोबाईल क्रमांक हस्तगत करुन तांत्रिक विश्लेषन करुन पिडीत व आरोपी यांना गर्दी फाटा ता. सांगोला जि. सोलापुर येथुन ताब्यात घेवुन त्यांना पोस्टे सेवली येथे पुढील तपासकामी ताब्यात देण्यात आले आहे. तसेच पोलीस स्टेशन गोंदी येथे गंधारी गायरान वस्ती ता. अंबड येथुन एका अल्पवयीन मुलीस आरोपी रोहीत राम मोरे रा. महाकाळा कारखाना ता. अंबड जि. जालना याने फिर्यादी लक्ष्मन रखमाजी पवार यांचे अल्पवयीन मुलीस फूस लावुन पळवून नेले बाबत तक्रारी वरुन पोस्टे गोंदी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात पोस्टे स्तरावर तपास करण्यात आला परंतु गुन्हयातील आरोपी व पिडीता मिळुन न आल्याने गुन्हयाचा पुढील तपास वरीष्ठांच्या आदेशाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष जालना यांच्याकडे देण्यात आला होता. प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष जालना यांनी सदर गुन्हयात पिडीत व आरोपीचा शोध घेण्याच्या दृष्टीकोनातुन झाल्या तपासाच्या कागदपत्राचे अवलोकन करुन प्रकरणात आरोपी व पिडीताची माहिती मिळविण्या करिता गुप्तबातमीदार नेमुन मिळालेल्या माहितीवरुन आरोपीच्या मोबाईल क्रमांक हस्तगत करुन तांत्रिक विश्लेषन करुन पिडीत व आरोपी यांना चिखली केडगाव ता. पलुस जि. सांगली येथुन ताब्यात घेवुन त्यांना पोस्टे गोंदी येथे पुढील तपासकामी ताब्यात देण्यात आले आहे.

# वसंतराव जाधव यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**मंठा । प्रतिनिधी**



**येथील जिजामाता अर्बन को. ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे अध्यक्ष तथा उमरखेड येथील माजी सरपंच वसंतराव जाधव यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार ता. २० रोजी छत्रपती संभाजीनगर येथे उपचारा दरम्यान निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६४ वर्ष होते.**

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, दोन मुले, सूना; नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर उमरखेड या त्यांच्या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध राजकीय पक्षांचे नेते, डॉक्टर, इंजिनियर, वकील, व्यापारी, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. ते द वर्ल्ड इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष शिवाजी जाधव व विकास जाधव यांचे वडील होते. तर उमरखेडचे सरपंच, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद जाधव यांचे काका होते.

# पान १ वरून...

### मनरेगा' मुद्द्यावर काँग्रेसचा देशव्यापी

उभारले गेले, असे त्यांनी नमूद केले. दीक्षित यांनी सांगितले की, गुरुवारी सकाळी दिल्लीतील जवाहर भवन येथे होणाऱ्या कार्यक्रमात देशाच्या विविध भागांतील कामगार सहभागी होतील. ते आपल्या संघर्षाच्या कथा मांडतील आणि भविष्यातील रणनीतीवर चर्चा करतील. कामगारांकडून आणलेली माती एकत्र करून मनरेगाच्या रक्षणासाठी सामूहिक संघर्षाचा प्रतीकात्मक संदेश दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

---------------

### शिंदे सेनेचा भाजपला

आमचे मित्र आहेत. ते आम्हाला पाठिंबा देत असतील तर त्यात गैर काय असा सवाल देखील शिंदे यांनी विचारला. दरम्यान, कल्याण डोंबिवलीतील राजकीय उटथापालथीनंतर आता मुंबईतही काही वेगळी खेळी होणार का याबाबत चर्चांना उधाण आले आहे. याबाबत बोलताना श्रीकांत शिंदे यांनी मुंबईत युतीचाच महापौर बसेल. त्यात शिवसेनेचा महापौर बसला नाही तर कुणाला आवडणार नाही. असे म्हणत श्रीकांत शिंदे यांनी राजकारणात काहीही घडू शकते असे संकेत दिले. आता कल्याण -डोंबिवलीत ठोकरेंच्या शिवसेनेचे ४ नगरसेवक काय करणार याच्याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. त्याचबरोबर आता भाजप यावर कशी प्रतिक्रिया देतो हेही पहावे लागणार आहे.

--------

### कृषी प्रदर्शनाहुन येताना बीडच्या दोन

नियंत्रण सुटल्याने त्यांची गाडी पुलावरून थेट खाली कोसळली. हा अपघात इतका भीषण होता की, एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसऱ्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचीही प्राणज्योत मालवली. श्रीकांत आणि महेश हे दोघेही शेतकरी कुटुंबातील कष्टाळू मुले होती. आपल्या शेतात केवळ पारंपरिक पिके न घेता, आधुनिक पद्धतीने केळीची बाग फुलवण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. केळी लागवडीचे तंत्रज्ञान आणि बाजारपेठेची माहिती घेण्यासाठीच त्यांनी खास बारामती गाठली होती. मात्र, प्रगत शेतीचे स्वप्न डोळ्यात घेऊन घरी परतणाऱ्या या तरुणांवर काळाने घाला घातला. या दोन्ही तरुणांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी, वनवेवाडी मातकुळी ता. आष्टी जिल्हा बीड येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

-------------

### बायकोनेच रचला

खोटे सांगून त्यांनी यांना बळजबरीने गाडीत टाकले. मात्र, त्यांना पोलीस ठाण्याऐवजी एका खासगी व्यसनमुक्ती केंद्रात नेण्यात आले आणि तिथल्या तिसऱ्या मजल्यावर कोंडून ठेवले. पीडित व्यक्ती घरी न परतल्याने त्यांच्या भावांनी आणि नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. सुरुवातीला पत्नीने ते प्रशिक्षणासाठी बाहेरगावी गेल्याचे सांगून सर्वांची दिशाभूल केली. मात्र, सत्य बाहेर आल्यावर पत्नीचे खरे रूप समोर आले. पगार खाते संयुक्त करा आणि घर माझ्या नावावर करा, तरच तुमची केंद्रातून सुटका होईल, अशी धक्कादायक अट तिने पतीसमोर ठेवली. यावरून हा सर्व प्रकार पूर्वनियोजित कट असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणावर सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे यांनी संताप व्यक्त केला. विधी सेवा प्राधिकरणाने यावर अहवाल मागवला असल्याचे सांगितले. चौकशीअंती दोषींवर कडक कारवाई होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक तेजस घुमरे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. पत्नीने रीतसर शपथपत्र आणि पुरावे दिले होते, त्या आधारेच प्रवेश दिला होता. तक्रारीत काहीही तथ्य नाही, असा दावा त्यांनी केला आहे. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

-----------

### शिरूर तालुक्यात कापूस

सदरील महिलेच्या चेहऱ्यावर स्कार्फ बांधलेला असल्यामुळे मोठी इजा टळल्याचे सांगितले जात आहे. जखमी महिलेला तत्काळ शिरूर कासार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना दूरध्वनीवरून कळविले आहे. परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, वनविभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

---------

### २४ लाख महिलांची चुकिने

राज्यभरात जवळपास एक लाख अंगणवाडी सेविकांना कामाला लावले आहे. ई-केवायसी फॉर्ममधील एक प्रश्न चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आला होता, ज्यात एका साध्या प्रश्नाऐवजी दोन नकारात्मक शब्दांचा वापर केला होता. मराठीतील प्रश्न असा होता की, तुमच्या घरातले कोणी सरकारी नोकरीत नाही ना?, ज्या लाभार्थींनी नाही असे उत्तर देणे अपेक्षित होते, त्यांनी वाक्याच्या गोंधळात टाकणाऱ्या रचनेमुळे होय असे उत्तर दिले आहे. या प्रश्नामुळे उत्तर देणाऱ्यांचा गोंधळ उडाला आणि सुमारे २४ लाख जणांनी होकारार्थी उत्तर दिले. याचा आपोआप अर्थ असा काढण्यात आला की कुटुंबातील किमान एक सदस्य सरकारी कर्मचारी आहे, आणि प्रणालीने मासिक पेमेंट थांबवले, असे महिला आणि बाल कल्याण विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. डेटा पुनरावलोकनादरम्यान ही चुक स्पष्ट झाली आहे. कारण, महाराष्ट्रात निम-सरकारी संस्था आणि महामंडळांमधील कर्मचाऱ्यांसह ८ ते ९ लाख सरकारी कर्मचारी आहेत. यामुळे हा प्रकार उघडकीस आला आहे. पुरुषही मदत घेत असल्याच्या किंवा सरकारी कर्मचाऱ्यांची लाभार्थी म्हणून नोंदणी झाल्याच्या तक्रारींनंतर ई-केवायसी मोहीम हाती घेण्यात आली होती. पडताळणी मोहिमेत या योजनेचा गंभीर गैरवापर झाल्याचे समोर आले आहे. केवळ महिलांसाठी असलेल्या या योजनेअंतर्गत १४,२९८ पुरुषांनी आर्थिक लाभ घेतल्याचे आढळले आणि १५०० हून अधिक राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे ही मदत घेतल्याचे समोर आले होते.

**पडताळणी होणार**

महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये सांगितले की, नोंदी दुरुस्त करण्यासाठी अंगणवाडी सेविकांमार्फत या लाभार्थींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाईल. ई-केवायसी मोहीम सुमारे २.३० कोटी लाभार्थींसाठी होती आणि योजनेअंतर्गत पात्रतेची खात्री करणे हा तिचा उद्देश होता. ई-केवायसी पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती.

-------------

### राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये

धुळे, नंदूरबार, जळगाव या तिनही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. ढगाळ हवामान आणि पावसामुळे काही दिवस थंडी कमीच राहील, अशी शक्यताही हवामान विभागाने वर्तविली आहे.

-----------

### बीडच्या सुपुत्राचा दावोसच्या

फडणवीस यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील आणि परिसरातील तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असून, ग्रामीण औद्योगिकीकरणाला चालना मिळाली आहे. बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नंदागौळ गावात शेतकरी कुटुंबात जन्मलेले भरत गीते यांनी शालेय व माध्यमिक शिक्षण गावी आणि परळीत घेतले. चौथी शिकलेले वडील शेतीसह टेलरिंग व किराणा दुकानाचाछोटेखानी व्यवसाय करीत. काहीकाळ त्यांनी ठेकेदारीचेही काम केले. पुढे पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सीओईपी) येथून अभियांत्रिकी शिक्षण घेतल्यानंतर जर्मनीत उच्च शिक्षण घेतले. जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आत्मसात करून ते भारतात परतले आणि 'मेक इन इंडिया'च्या भावनेतून उद्योग उभारणीस सुरुवात केली. आज 'तौरल इंडिया'मार्फत संरक्षण, ऊर्जा, रेल्वे, हेल्थकेअर आणि एरोस्पेससारख्या संवेदनशील क्षेत्रांसाठी अचूक ॲल्युमिनियम कास्टिंग निर्मिती केली जात असून सिमेन्स, जनरल इलेक्ट्रिकल्स, एबीबीयांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विश्वास मराठवाड्यातील उद्योजकावर बसला आहे. 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' आणि 'व्होकल फॉर लोकल' या केंद्र सरकारच्या उपक्रमांना बळ देणाऱ्या या उपक्रमांतून कमी कालावधीत उद्योग उभारणी शक्य असल्याचा प्रेरणादायी संदेश देशभरातील उद्योजकांना मिळाला आहे. भरत गीते म्हणाले, "तौरल इंडियाने २०१६ पासून औद्योगिक विस्तार करत ऊर्जा क्षेत्र, संरक्षण उत्पादन, आरोग्य उपकरणे तसेच एरोस्पेस क्षेत्रासाठी आवश्यक अचूक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज निर्मितीत भरीव योगदान दिले आहे. विविध क्षेत्रांतील या योगदानामुळे राज्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळत असून, आर्थिक वाढीस हातभार लागत आहे. उत्पादन क्षेत्र हे मजबूत अर्थव्यवस्थेचा कणा असून, वाहन उद्योग, अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मोबिलिटी, संरक्षणपूरक उद्योग, कृषी प्रक्रिया आणि उच्च-मूल्य निर्यातक्षम उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास राज्याचा औद्योगिक पाया अधिक भक्कम होईल." मेक इन इंडिया हा भारतीयांसाठी भावनेचा विषय असून, त्याच भावनेतून जर्मनीतील संधी सोडून भारतात परतलो व उद्योग सुरु केल्याचे गीते अभिमानाने सांगतात.

---------------

**क्र.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अंबाजोगाई**
**दि.१३.०१.२०२६**

## जाहिरनामा

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की. श्री खालेख जलील कुरेशी रा.घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि.बीड यांचा जन्म दि.२०.०१.१९९३ रोजी राहात्या घरी घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि.बीड येथे झालेला आहे. झाला असून अर्जदारांनी यांच्या सदरहू कायदेशीर जन्म् नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्म दिनांक २०.०१.१९९३ कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदार यांचा जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार अंबाजोगाई**

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६


## थोडक्यात



**दिंद्रुड :-धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील पैलवान सुरेश अशोक खांडेकर याची ५७ किलो वजन गट चाचणीमध्ये महाराष्ट्र केसरी बीड जिल्ह्यातून स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल जवळा येथील सरपंच त्रिंबक साबळे गावकरी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.**

### भाऊराव बहीर यांचे दुःखद निधन

नवगण राजुरी । प्रतिनिधी



येथील प्रगतशील शेतकरी भाऊराव बाबासाहेब बहीर यांचे मंगळवारी सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ६२ वर्षांचे होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन श्रीराम बहीर यांचे ज्येष्ठ बंधु भाऊराव बहीर हे राजकीय, सामाजिक जीवनात गोरगरीबांच्या संकटावेळी ते मदतीला धावून जात असत. सतत उत्साही असणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे नवगण राजुरी परीसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर मंगळवारी सायंकाळी शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, दोन भाऊ असा परीवार आहे.

### श्री सिद्धेश्वर विद्यालयात डॉ. हेडगेवार जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी



प्रति वर्षीप्रमाणे याही वर्षी येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात प. पू. डॉ हेडगेवार जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २३ जानेवारी शुक्रवार रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा इयत्ता आठवी ते दहावी या गटासाठी असून या स्पर्धेसाठी विषय पुढील प्रमाणे आहेत १) सामाजिक माध्यमे (सोशल मीडिया) परिणाम-दुष्परिणाम २) भारतीय कुटुंबव्यवस्था - आदर्श व्यवस्था . स्पर्धकाने यापैकी एका विषयावर आपले विचार सात मिनिटात मांडावे. स्पर्धकांनी आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या अनुमतीने ९८५०४१८१३० , ९६३७९८४९८५ तसेच हीीारक्षरश्रसरेपसारळश्र.ले या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करावी. या स्पर्धेत प्रथम बक्षीस २००१/- रुपये , द्वितीय १५०१/- रुपये , तृतीय १००१/- रुपये तर उत्तेजनार्थ ५०१/- रुपये सर्व बक्षीस पात्र स्पर्धकांना स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते स्पर्धा संपल्यानंतर पारितोषिक वितरण समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व माध्यमिक विद्यालयाने आपल्या विद्यालयातून एक स्पर्धक पाठवून स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले आहे.

# आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांचा हम करेसो कायदा

### हुकुमशाही, भ्रष्ट व भोंगळ कारभाराच्या विरोधात ग्राममहसूल अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांचा महाएल्गार

### तहसिलदार वैशाली पाटील यांची जोपर्यंत बदली होत नाही तोपर्यंत कामावर न येण्याचा महसूल कर्मचाऱ्यांचा निर्धार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांच्या हुकुमशाही व दडपशाही कारभारामुळे आष्टी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सततच्या जाचाला कंटाळले असून तहसिलदार पाटील यांची बदली होत नाही तो पर्यंत सर्व ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतलेले आहे. ग्राम महसूल अधिकारी प्रवीण शिंदे यांची बदली करून योग्य कार्यवाही होणार नाही तोपर्यंत सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतलेले आहे.उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दि.२० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद आहे.की तहसिलदार पाटील हे सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळअधिकारी यांना एकदम खालच्या पातळीची वागणूक देत आहेत हाम करोसा कायदा अश्या पद्धतीने वागत आहेत. प्रत्येक कामात दमदाटी करून अर्वाच्य भाषेत बोलतात त्यामुळे सर्व कर्मचा-यामध्ये दहशतीचे व भितीचे वातावरण झाले आहे. सात दिवसाच्या आठवड्यामध्ये कमीत कमी पाच दिवस बैठका घेतात त्यामुळे लोकांचे काम होत नाही. त्यांच्या मर्जीतले काही मोजके लोकं सोडता प्रत्येकाला टार्गेट करून खालच्या पातळीने बोलतात तसेच बैठकीमध्ये टार्गेट करून मानसिक खच्चीकरण करून सर्वासमोर हिन दर्जाची वागणून त्यांच्याकडून मिळत आहे. ग्राममहसूल अधिकारी असो की मंडळ अधिकारी प्रत्येकाला शिपाई दर्जापेक्षा खालची वागणूक दिली जाते दिनांक १६ जानेवारी रोजी आष्टी तहसिल मध्ये ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी तालुका कार्यकारणीची निवड होती त्याअनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी कामकाज करत असतांना येणाऱ्या अडचणी बाबत चर्चा झाली त्यावरून तहसिलदार वैशाली पाटील यांना प्रचंड राग आला असून त्यामुळे प्रत्येकावर पूर्वग्रहदूषित भावनेने व जाणून बुजून त्रास देण्याची मानसिकता तहसिलदार आष्टी यांची आम्हाला दिसून येत आहे व ते सत्य आहे.दिनांक १७ जानेवारी रोजी सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची बैठक सकाळी ११ वाजता बोलावण्यात आली होती. त्यामधे प्रवीण शिंदे ग्राम महसूल अधिकारी यांनी अध्यक्ष निवडीवरून बैठकीमध्ये महिला कर्मचारी यांच्या समोर अर्वाच्य व गलिच्छ भाषामध्ये अरेरावी केली. यावेळी स्वतः तहसिलदार आष्टी हे उपस्थित असून कोणत्याही प्रकारची समज न देता प्रोत्साहन दिले. त्यानंतर दिनांक १९ रोजी परत सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची परत नेहमी प्रमाणे बैठक बोलावण्यात आली. तहसीलदार व नायब तहसिलदार यांचे समक्ष बैठक सुरु झाल्यानंतर प्रवीण शिंदे ग्राम महसूल अधिकारी यांनी बाहेरचे गुंड प्रवृत्तीचे दोन व्यक्ती सोबत आणून बैठकीमध्ये सुरुवातीला धुमाकूळ घालून अर्वाच्य भाषेत शिविगाळ सुरु केले त्यानंतर अध्यक्ष ग्राम महसूल अधिकारी अशोक सुरवसे व ग्राम महसूल अधिकारी गव्हाणे साहेब यांनी त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी बैठक सुरु असतांना गुंड प्रवृत्तीच्या लोकांना बोलावून समज देण्याऱ्या दोघांनाही ठोकून काढा असे तहसिलदार समक्ष सांगितले व बैठक हॉल च्या बाहेर बोलावून दमदाटी केली. हे सर्व तहसिल आष्टी यांचे समोर घडूनही तहसिलदार यांनी शिंदे यांची बाजू घेवून नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, व ग्राम महसूल अधिकारी यांना दमदाटी करण्यास सुरुवात केली. माझी कुठे तक्रार करायची करा कलेक्टरकडे जा अथवा मंत्र्याकडे जा माझं कोण काही करू शकत नाही मी सर्व ठिकाणी फिरून आले आहे मला काही फरक पडत नाही. नौकरी सोडून द्या, नौकरी करण्याच्या लायकीचे तुम्ही नाही, तुम्ही जनावरांसारखे आहात अधिकारी यांचा त्रास काय असतो हे तुम्हाला आता मी दाखवते असे वारंवार बोलून मानसिक त्रास सुरु आहे.त्यामुळे ह्या गुंड प्रवृत्तीच्या वैशाली पाटील तहसिलदार आष्टी यांची जो पर्यंत बदली होत नाही तो पर्यंत आम्ही सामुहिक रजा आंदोलन मागे घेणार नाही व तो पर्यंत कोणतेही कामकाज आम्ही करणार नाही असा इशारा देऊन ग्राममहसूल अधिकारी मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर गेले आहेत.या निवेदनावरती अध्यक्ष अशोक सुरवसे यांच्यासह ३७ ग्राममहसूल अधिकारी मंडळ अधिकारी यांच्या सह्या आहेत. तालुक्यामध्ये बेसुमार वाळू उपसा प्रचंड हप्ते खोरी माजली आहे


# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीस १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

दिनांक २६/०५/२०२१ रोजी पिडीत अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी सरफराज रशिद सय्यद रा. इस्लामपुरा, पेठ बीड यास मा. व्ही. एच. पाटवदकर साहेब अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश - १ तथा विशेष न्यायाधिश बीड यांनी दोषी ठरवून १० वर्ष सश्रम कारावास व ९,०००/-दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

या प्रकरणाची थोडक्यात हकिगत अशी की, आरोपी याने फिर्यादी हि अल्पवयीन आहे हे माहित असतानां देखील तिला लग्नाचे अमिष दाखवुन फुस लावुन घरातुन पळुन जाण्यास भाग पाडले व त्यानंतर तिचे ईच्छेविरुध्द तिचे सोबत बळजबरीने शारिरीक संबंध ठेवले. अशा आशयाच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पेठ बीड आरोपी विरुध्द कलम ३६३, ३६६ (ए),३७६ (२) (जे) (एन) भादवी आणि कलम ३, ४ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरुन तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक जी. एच. पठाण यांनी या प्रकरणाचा तपास केला व





जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय, बीड येथे आरोपी विरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावनी मा. व्ही. एच. पाटवदकर साहेब अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ तथा विशेष न्यायाधिश बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ११ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणात पिडीता हिचा जबाब, वैद्यकिय पुरावा व कागदपत्रे यावरून व सहा. सरकारी वकिल सुहास व्ही. सुलाखे यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. व्ही. एच. पाटवदकर साहेब अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ तथा विशेष न्यायाधिश बीड यांनी आरोपी यास कलम ३६३, ३६६ (ए), ३७६ (२) (जे) भादवी आणि कलम ४ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ प्रमाणे दोषी ठरवत १० वर्ष सश्रम कारावास व ९,०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास ९ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल सुहास व्ही. सुलाखे यांनी काम पाहिले त्याचप्रमाणे फिर्यादी तर्फे ॲड. शाम देशपांडे व त्यांचे सहकारी ॲड. यशवंत मुंडे व ॲड. सुनिल ढाकणे यांनी काम पाहिले तसेच पैरवी अधिकारी पोपट साहेबराव गव्हाणे आणि बाळासाहेब भिमराव सानप यांनी सहकार्य केले.

## पान ६ वरुन...

### स्वच्छता, लाइट, पाणी,

करून चालू करावे, शहरातील शहरातील पाईपलाईन लिकेज दुरुस्ती करण्यात यावी, कचरा घंटागाड्या नियमित करा, मुख्य चौका सह शहरातील कब्रस्तान समशानभूमी मंदिर मस्जिद परिसरात सौर ऊर्जा विद्युत लाईटी बसवावेत अश्या विविध मागण्या बैठकीत केले आहेत, यावेळी गटनेते खुर्शीद आलम यांच्या सह नगरसेवक उल्हास ग्राम साहेब, नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक शेख अतहर बब्बु, नगरसेवक सुधाकर जाधव, नगरसेवक भारत कांबळे, नगसेवक रंजीत पिंगळे, नगरसेवक मोमीन मोहसीन, नगरसेवक पठाण अफसर, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक शेख रोहील, नगरसेवक शेख रईस, नगरसेवक मसी मोमीन, नगरसेवक शेख अफसर उपस्थित होते,

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा

सामना कोल्हापूर च्या संघाशी चूर्षीचा २-१ असा झाला , व तृतीय क्रमांकाचा सामना लातूर विभागाशी झाला लातूर विभागाला सहज पराभव करून २-० ने विजय मिळवून, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा संघ कांस्य पदकाचा मानकरी ठरला. या संघामध्ये सहभागी खेळाडू कर्णधार वैष्णवी कोरडे, आदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, गौरी गायकवाड या मुलींचा सहभाग होता,विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश भाऊ चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक , प्रा. संजय बागुल, प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. इम्रान पठाण प्रा. डॉ. एकनाथ शेंडगे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### शासकीय कर्मचाऱ्यांना सक्ती

वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये दंडात्मक कारवाईसह आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

सर्व दुचाकीस्वारांनी स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहन चालवताना अनिवार्यपणे हेल्मेटचा वापर करावा, तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. सदर मार्गदर्शन सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व जिल्हा वाहतूक शाखेचे अंमलदार यांनी केले आहे.

### ग्रामीण भागातील नर्सेसचे

सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री दयानंद .एस सरपते साहेब व जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी श्री सचिन शेकडे साहेब यांनी केले, व नर्सेस चे सर्व प्रश्न सोडवण्याचे व त्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी तथा प्रशासन अधिकारी डॉ .श्री रौफ सर यांनी दिले. तसेच सदरील कामकाजासाठी सर्व कनिष्ठ प्रशासन अधिकारी व आस्थापना यांनी सहकार्य केले संघटनेच्या वतीने संघटनेच्या पदाधिकारी म्हणून श्रीमती लोखंडे, श्रीमती पाटोळे सिस्टर, श्रीमती आत्राम सिस्टर, श्रीमती बनकर सिस्टर, श्रीमती पवार सिस्टर, श्रीमती वैशाली मिसाळ, कार्याध्यक्ष श्रीमती पडलवार सिस्टर सरचिटणीस श्रीमती बहिरवाल उपस्थित होत्या, संघटनेच्या सचिव या नात्याने श्रीमती विद्या घुगे यांनी वरिष्ठांकडे प्रश्न मांडले व संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती राधा जाधव यांनी सर्व बीड जिल्हा ग्रामी.ण नर्सेस संघटनेच्या वतीने आजच्या बैठकीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे धन्यवाद मानले

### रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती

प्रवीण देशमुख डी वाय एफ आय.युवक संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख, राज्य कमिटी सदस्य प्रशांत म्हस्के, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष जगन्नाथ पाटोळे, राहुल भावटणकर, परळी तालुकाध्यक्ष विजय घुगे, मुंजा नवगरे, सिद्राम सोळंके, जगदीश देशमुख, अशोक वाघमारे, प्रशांत देशमुख, प्रथवी देशमुख, प्रकाश कावळे, मदन राठोड,एकनाथ पांचाळ, अशोक जाधव प्रकाश घाडगे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक सहभागी होते.

### लैंगिक अत्याचाराच्या

दिनांक १७/०१/२०२६ रोजी आरोपींचे वकील ॲड. अशोक मुंडे यांनी आरोपींची बाजू मांडली व केलेल्या युक्तिवादावरून मे. बीड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने गेवराई तालुक्यातील या दोन्ही आरोपींना अटी व शर्तीवर जामीन मंजूर केला आहे. आरोपींच्या वतीने बाजू ॲड. अशोक मुंडे यांनी मांडली व त्यांना याकामी त्यांचे सहकारी ॲड. तुषार विधाते व ॲड. आदर्श जाधव यांनी सहकार्य केले.

### राज्याध्यक्षपदी डॉ.राजेश इंगोले

वलय निर्माण करून देऊन त्या पदाचा उपयोग उत्कृष्ट पद्धतीने कसा करता येईल आणि ते पद कसे संघटनाभिमुख करता येईल यात त्यांचा हातखंडा कुणीच धरू शकत नाही असे गौरवोद्गार काढले.

डॉ राजेश इंगोले यांनी यापूर्वी अंबाजोगाई इंडियन मेडिकल असोसिएशनचे सलग सात वर्षे अध्यक्ष म्हणून काम पाहिले, महाराष्ट्राचे सचिव म्हणून ते कार्यरत राहिले, नुकतीच त्यांची राष्ट्रीय मध्यवर्ती कार्यकारणी व नियुक्ती झाली होती त्या पाठोपाठ इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्य कार्यकारिणीने त्यांच्यावर विश्वास दाखवून सलग चौथ्या वर्षी त्यांना महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी पदस्थापना दिली आहे. डॉ.इंगोले यांच्या नियुक्तीमुळे अंबाजोगाई परिसरामध्ये आनंद व्यक्त होत आहे. अंबाजोगाईतील सांस्कृतिक क्रीडा, शैक्षणीक, सामाजिक, राजकीय क्षेत्रांमध्ये डॉ.इंगोले यांचा सहज व महत्वपूर्ण वावर असतो. अंबाजोगाईतील अनेक कार्यक्रमांमध्ये डॉ.राजेश इंगोले यांना प्रमुख पाहुणे आणि व्याख्याता म्हणून ही अनेक शैक्षणिक संस्था सामाजिक संस्था आग्रहाने बोलावतात. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अनेक हितचिंतकांनी तसेच मित्र परिवाराने डॉ.इंगोले यांना भावी वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ.इंगोले यांच्या नियुक्तीमुळे अंबाजोगाई शहराचे नांव महाराष्ट्रातील कोनाकोपऱ्यातील डॉक्टरांना माहित झाल्याचे, तसेच अंबाजोगाईचा नांवलौकिक सर्व दूर पसरवण्याचे काम डॉ.राजेश इंगोले यांनी केले आहे असे मत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अंबाजोगाई शाखेच्या सर्व डॉक्टरांनी व्यक्त केले. यावेळी माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, डॉ.संतोष कदम, डॉ.अनिल पाचणेकर, डॉ.अशोक तांबे, डॉ.शैलेश वैद्य, डॉ.अनुपम टाकळकर, डॉ.उज्ज्वला दहिफळे, डॉ.अशोक कदम, डॉ.अजित केंद्रे, डॉ.आनंद मुळे, डॉ.दिनकर राऊत, डॉ.रमेश भराटे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.झुबेर शेख, डॉ.श्रीनिवास रेड्डी, डॉ.गोपाळ पाटील, डॉ.अंबादास गुण्णाल यांनी सदरील नियुक्तीबद्दल डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# परळी नगरपालिकेचा ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन उपयोगात !

परळी । प्रतिनिधी



केंद्र सरकारच्या गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस) पोर्टलवरून परळी नगरपालिकेने खरेदी केलेली ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन तब्बल एक वर्षाहून अधिक काळ वापरात नसल्याने धूळखात पडून होता. मात्र शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आज हे अत्यंत उपयुक्त यंत्र प्रत्यक्ष उपयोगात आणण्यासाठी सेवेत कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे शहरातील अरुंद भागातील स्वच्छतेची कामे करण्यासाठी गती मिळणार आहे.

परळी वैजनाथ शहरातील अनेक अरुंद भाग, गल्लीबोळा, दाट वस्तीचे भाग तसेच ज्या ठिकाणी मोठ्या आकाराची जेसीबी पोहोचू शकत नाहीत, अशा ठिकाणी स्वच्छता, गाळ काढणे, कचरा हटवणे आणि लहान स्वरूपाची खोदकामे करण्यासाठी ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन अत्यंत उपयुक्त ठरणारे उपकरण आहे.. ही गरज लक्षात घेऊन नगरपालिकेने कंत्राटी तज्ञ ऑपरेटरची नियुक्ती करत आज विधिवत श्रीफळ वाढवून या यंत्राच्या वापराची सुरुवात केली.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, बाजार समिती सभापती सूर्यभान मुंडे, माजी उपनगराध्यक्ष तथा रा.कॉ. शहराध्यक्ष आयुब पठाण, गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक शेख इस्माईल, नितीन रोडे,अनंत इंगळे,अल्ताफ पठाण, नगरसेवक अजिज कच्छी, जयराज देशमुख, माजी नगरसेवक राजेंद्र सोनी,संपादक मोहन व्हावळे, तुकाराम धोत्रे,महेंद्र रोडे,गोविंद कुकर यांच्यासह नगरपालिकेतील स्वच्छता विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शहरातील स्वच्छतेसाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या मशीन च्या माध्यमातून नियमित स्वच्छता मोहिमा अधिक वेगाने व कार्यक्षमतेने राबवता येणार असून विशेषतः पावसाळ्यापूर्वी नाले, गटारे स्वच्छ करण्यास मोठी मदत होणार आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी अशा यंत्रांचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येणार आहे.परळी शहरातील स्वच्छता व्यवस्थेला यामुळे आणखी बळ मिळाले आहे.आगामी काळात याचा थेट लाभ नागरिकांना होणार आहे.दीर्घकाळ उपयोगात नसलेले हे यंत्र प्रत्यक्ष कामात उतरवल्याने नागरिकांमधूनही समाधान व्यक्त होत आहे.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं./२०२६**
**ओमकार-विरुध्द-ग्रामपंचायत येळंबघाट**
**पहा**

१. ओमकार पि.अनिल सुरवसे रा. येळंबघाट ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक / मृत्यु धारक प्रतिभा भ्र. अनिल सुरवसे यांचा दिनांक २४/०३/२००१ रोजी मृत्यु झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय न..प.कार्यालयास येळंब घाट ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्टरला घेवुन जन्म/ मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत मृत्यु कार्यालय मौजे येळंबघाट ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २१/०२/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार, बीड**

**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जी. विभाग)**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५६०
दिनांक- ०६/०१/२०२६

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान / श्रीमती अरुण उत्तम शहागडकर रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आई जन्म/मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- |
| सुशिलाबाई उत्तमराव पुराणिक शहागडकर | आई | ०१/०३/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाच्द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

मुख्याधिकारी नगरपरिषद / ग्रामविकास अधिकारी/ग्राम महसुल अधिकारी ग्रामपंचायत अंबड ता. अंबड जि. जालना यांना देवुन कळविण्यात येते की, सदरील जाहिर प्रगटन हे नोटीस बोर्डावर डखवुन लेखी पंचनामा या कार्यालयास सादर करावा.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७६१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १६/१२/२०२५

**नाव बदलण्याचा**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ.हरी भाऊसिंग चव्हान

प्रकरण : सर्वे नं -३५१ सहन प्लॉट नं-३८ सिटी सर्वे नं.३७५० न.प.मि.नं.१८-१८५-३८ व प्लॉट नं. ३९ सिटी सर्वे नं.३७५१ न.प.मि.नं.१८-१८५-३९ व प्लॉट नं.४० सिटी सर्वे नं.३७४२ न.प.मि.नं.१८-१८५-४० व प्लॉट नं.४१ सिटी सर्वे नं.३७५३ नं.प.मि.नं.१८-१८५-४१ व प्लॉट नं.४२ सिटी सर्वे नं.३७५४ न.प.मि.नं. १८-१८५-४२ व प्लॉट नं.४३ सिटी सर्वे नं. ३७५५ न.प.मि.नं.१८-१८५-४३ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नं.४४ व जिल्हा परिषद शाळेचे कंपाऊंड
दक्षिण :-९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर प्लॉट नं -९ मी.रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७४२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १८/१२/२०२५

**नाव बदलण्याचा**
**जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- उज्वला रविनाथ राठोड

प्रकरण : सर्वे नं -३५१ सहन प्लॉट नं-२६ सिटी सर्वे नं.३७५८ न.प.मि.नं.१८-१८५-५८ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१८५-५८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.


चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं.४५
पश्चिम :- याच सर्वे नं.मधील भाग
दक्षिण :-जिल्हा परिषद शाळा
उत्तर प्लॉट नं -९ मी.रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना आता १० टक्के रक्कम भरून मिळणार सौर कृषीपंप

**पुणे । प्रतिनिधी**

**मागेल त्याला सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांसाठी सिंचनासाठी अत्यंत उपयुक्त आणि स्थायी आहे. सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांसाठी केवळ १० टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंपाचा संपूर्ण संच वितरित केला जातो. तर अनुसूचित जाती-जमातींच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के आहे, बाकीचे केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदानरूपात मिळते.**



जमिनीच्या आकारानुसार, ३ ते ७.५ अश्वशक्तीच्या पंपांसह पाच वर्षांची दुरुस्ती हमी, विमा, वीजबिलाची समस्या नाही आणि लोडशेडिंगची अडचण नाही. सिंचनासाठी दिवसाच्या वेळेत वीज पुरवठा शक्य झाला आहे. २.५ एकरपर्यंत शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंत सौर कृषी पंप, २.५१ ते ५ एकरपर्यंत शेतजमीन धारकांसाठी ५ अश्वशक्ती आणि ५ एकरांवरील शेतजमीन धारकांसाठी ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप देण्याची योजना आहे. पात्र क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या सौर कृषी पंपाची मागणी केल्यास तो मान्य केला जाईल. वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहिरी, बोअरवेल यांचे मालक बारमाही वाहणाऱ्या नदी/नाल्यांजवळील शेतजमीन धारक शेतकरीदेखील या योजनेसाठी पात्र होतील. ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत पाण्याचा स्रोत आहे, जसे की बोअरवेल, विहिरी वगैरे, त्याची खात्री महावितरणद्वारे केली जाईल. तथापि, जलसंधारणाच्या कामाच्या पाणी साठ्यामधून पाणी उचलण्यासाठी हे पंप वापरता येणार नाहीत. अटल सौर कृषी पंप योजना-१, अटल सौर कृषी पंप योजना-२ आणि मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना या योजनांचा लाभ न घेतलेले शेतकरी देखील या अभियानांतर्गत लाभास पात्र असतील. याबाबत महावितरणच्या सूत्रांनी प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले; मात्र, अधिकृत पुरवठा का होऊ शकलेला नाही, या प्रश्नावर महावितरणकडून अधिक माहिती मिळालेली नाही. तसेच मागेल त्याला एक महिन्यात सौरपंप देणार असल्याचे महावितरणच्या वतीने सांगण्यात आले.

# वाळलेला निकृष्ट चारा या पद्धतीने करा दर्जेदार



**निकृष्ट दर्ज्याच्या चाऱ्यामुळे पशुधनाची क्रयशक्ती, दूध उत्पादन यावर विपरीत परिणाम होत असतो. पशुधनास जो चारा खाण्यास दिला जातो, त्यात प्रामुख्याने हिरवा चारा, वाळलेला चारा, गव्हाचा, भाताचा, तुरीचा, व ज्वारीचा भुसा, किंवा सोयाबीनचे काड, खुराक म्हणून पेंड यांचा समावेश केलेला आहे. परंतु हल्ली हिरवा वाळलेला चारा व पेंड इत्यादींच्या किमतीमध्ये खूप वाढ झालेली आहे. यासाठी उपलब्ध निकृष्ट चाऱ्यावरच प्रक्रिया करून ते गुणवत्तापूर्ण करता येते.**

**निकृष्ट चारा गुणवत्तापूर्ण करायचे फायदे:**

निकृष्ट वाळलेले गवत, गव्हाचे काड, सोयाबीनचा भुसा, वाळलेली वैरण साठवून ठेवून त्यावर युरियाची प्रक्रिया केल्यास निकृष्ट चारा पासून उत्कृष्ट व सकस चारा तयार करून जनावरांना देता येऊ शकतो. या प्रक्रियेतून चाऱ्याची पाचकता वाढते. तसेच चाऱ्याची गरज भागवता येते. पीक कापणीच्या वेळीच बदल घडविणे किंवा त्यात जैविक बदल घडविणे, काडा सोबत प्रथिने व ऊर्जा समृद्ध अन्न घटकांचा समावेश करून जनावरांना खाऊ घातल्यास अधिक फायदा होतो. उदा. २०० किलो वजनाच्या जनावराला आपण गव्हाच्या काडा सोबत चार किलो खुराक दोन किलो व हिरवे गवत दोन किलो दिल्यास अधिक फायदेशीर राहते. पशुधन जर दूध देणारे असेल तर काडाची कुट्टी सहा किलो व खुराक सहा किलो याप्रमाणे दिल्यास दूध उत्पादनामध्ये फायदा होतो. काडाला भौतिक प्रक्रिया केल्यास त्याची पचनशक्ती वाढते. उदा. चारा कुट्टी, काडाची कुट्टी केल्यास ते अधिक पचनीय होते. जनावरे ते अधिक प्रमाणात खातात तसेच कडबा कुट्टी केलेले काड जर पाण्यामध्ये रात्रभर भिजवले किंवा खाऊ घालण्याचा दोन तास अगोदर भिजवले तर जनावरे ते अधिक प्रमाणात खातात व खाल्ल्यानंतर अधिक ऊर्जा प्राप्त करून देतात. कमी प्रतिच्या चाऱ्यासोबत युरिया, मळी, क्षार मिश्रण एकत्रित करून त्याची वीट तयार केल्यास व ते चाटण म्हणून जनावराला उपलब्ध करून दिल्यास पशुधन निकृष्ट प्रतिचा चारा १५ ते ३० टक्के जास्त खातात. ज्यामुळे खुराकाची आवश्यकता कमी होते व पशुधनाच्या वजनामध्ये दैनंदिन वाढ होते. दुधाचे उत्पादन १५ ते २० टक्के वाढू शकते. वाळलेल्या चाऱ्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण एक ते दीड टक्के असते. युरिया प्रक्रिया केल्याने प्रथिनांचे प्रमाण आठ ते नऊ टक्के पर्यंत वाढते. चाऱ्याची पाचकता वाढते. चारा टंचाईच्या काळात टाकाऊ चारा उपयोगात आणून चाऱ्याची गरज भागवता येते.

**वाळलेल्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचे साहित्य :**

१) वाळलेला चारा १०० किलोग्रॅम. २) युरिया १.५ ते २ किलोग्रॅम. ३) कमी प्रतिचा गूळ ३ किलोग्रॅम. ४) क्षार मिश्रण १ किलोग्रॅम. ५) खडे मीठ १ किलोग्रॅम. ६) पाणी २० लिटर.

**चाऱ्यावर प्रक्रिया करण्याची पद्धत :**

वाळलेल्या चाऱ्याची कुट्टी करून घ्यावी. १०० किलो चाऱ्याच्या कुट्टीसाठी दीड ते दोन किलो युरिया २० लिटर पाण्यात विरघळून तयार झालेल्या द्रावणात १ किलोग्रॅम मीठ व ३ किलोग्रॅम गूळ मिसळून ढवळून एकजीव करावे. फरशीवर किंवा चवाळ्यावर चाऱ्याच्या कुट्टीचा पंधरा सेंटीमीटर थर घेऊन त्यावर द्रावण शिंपडावे, त्यावर क्षार मिश्रण टाकावे. कुट्टी वर खाली करून चांगले मिसळावे अशाप्रकारे कुटीचे एकावर एक थर देऊन त्यावर तयार केलेले द्रावण व क्षार मिश्रण टाकून मिसळावे. प्रक्रियायुक्त कुट्टी दाबून त्यातील हवा बाहेर काढून टाकावी. त्यावर प्लास्टिक कागद झाकून हवा बंद करावे. प्रक्रियायुक्त कुट्टी चारा २१ दिवसानंतर पशुधनास () खाण्यात देण्यात यावा.

**प्रक्रियायुक्त कुट्टी देण्याचे प्रमाण :**

प्रक्रियायुक्त कुट्टी सुरुवातीला जनावरांना एक ते दीड किलो प्रमाणात देऊन पंधरा दिवसापर्यंत वाढवत नेऊन एका जनावरास चार ते पाच किलोग्रॅम पर्यंत प्रतिदिन द्यावी. सहा महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांना व रवंथ करणारे लहान प्राणी शेळ्या मेंढ्यांना देऊ नये.

**प्रक्रिया कुट्टी वापरण्याचे फायदे :**

प्रक्रियायुक्त कुट्टी वापरल्यास होणारा खर्च कडबा पेक्षा कमी असतो, त्यामुळे चाऱ्यावरील खर्चात बचत होते. वाया जाणारे सुके गवत गावाचे काड याचा वापर केल्याने वैरणीची बचत होते. जनावरांच्या पोटातील खाद्याचे पचन करणाऱ्या जीवाणूंच्या संख्येत वाढ होते. त्यामुळे जनावरांची भूक वाढते व एकूण पचने पदार्थ अधिक प्रमाणात मिळतात. दूध उत्पादनात वाढ प्रक्रिया केलेले काड, गवत कडबा तुलनेत जास्त पौष्टिक असते. प्रक्रियेमुळे प्रथिनांचे प्रमाण ४ टक्के पर्यंत आणि एकूण पचनीय पदार्थाचे प्रमाण ४२ टक्के पासून ५६% पर्यंत वाढते, यामुळे दूध उत्पादनात वाढ होते.

# बारामती बाजार समितीत मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू




**बारामती । प्रतिनिधी**

**बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजार आवारात मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. बाजार आवारात लिलावामध्ये मका दर हमीभावापेक्षा कमी मिळत आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांनी हमीभाव केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती.**

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) खरेदी योजनेअंतर्गत हंगाम २०२५-२६ साठी मका खरेदीसाठी ऑनलाइन नाव नोंदणी सुरू आहे. ज्या मका उत्पादक शेतकऱ्यांनी अद्याप ऑनलाइन नोंदणी केलेली नाही, त्यांनी २८ फेब्रुवारीपर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे. ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे मका आणण्याची तारीख कळविण्यात येणार आहे. त्याच दिवशी शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर मका आणावा. मका हमीभाव प्रति क्विंटल २४०० रुपये असून, प्रति एकर ९.५० क्विंटल मका खरेदी करण्यात येणार आहे. शासनाने ठरवून दिलेल्या अटींनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करूनच नाव नोंदणी करावी लागणार आहे. हे खरेदी केंद्र जळोची उपबाजार येथील भाजी मार्केट आवारातील गोदामात सुरू असल्याची माहिती बाजार समितीचे सचिव अरविंद जगताप यांनी दिली. दरम्यान, बाबालाल काकडे नीरा कॅनॉल संघामार्फत ऑनलाइन नोंदणी सुरू असून आतापर्यंत २२० शेतकऱ्यांनी नाव नोंदणी केली आहे. शासनाने दिलेल्या निकषांनुसारच मका खरेदी केली जाणार असल्याने शेतकऱ्यांनी मका पूर्णपणे वाळलेली व स्वच्छ करूनच खरेदी केंद्रावर आणावी, असे आवाहन नीरा कॅनॉल संघाचे अध्यक्ष सतीश काकडे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनो, ट्रॅक्टर खरेदी करताना या बाबी तपासा

ट्रॅक्टर हा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा घटक बनला आहे. कारण शेतीच्या प्रत्येक कामासाठी ट्रॅक्टर आवश्यक होत चालला आहे. मग पेरणीपासून सिंचनापर्यंत, वाहतुकीपर्यंत, कापणीपर्यंत ट्रॅक्टर महत्त्वाची भूमिका बजावतो आहे. आजकाल बाजारात ट्रॅक्टरचे अनेक मॉडेल्स दिसून येतात, मात्र योग्य ट्रॅक्टर निवडल्याने वेळ आणि श्रम दोन्ही वाचतात, मात्र अनेकदा शेतकऱ्यांची फसवणूक होते, अशावेळी नवीन ट्रॅक्टर खरेदी करताना काही गोष्टीची काळजी घेतली पाहिजे.

प्रथम, तुमच्या शेतीच्या गरजा समजून घ्या. ट्रॅक्टर खरेदी करण्यापूर्वी, शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरची गरज लक्षात घेतली पाहिजे. जर क्षेत्र लहान असेल तर हलका आणि कमी अश्वशक्तीचा ट्रॅक्टर पुरेसा असू शकतो. तथापि, मोठ्या शेतात जड अवजारे आणि ट्रॉली ओढण्यासारख्या कामांसाठी अधिक शक्तिशाली ट्रॅक्टरची आवश्यकता असते. लहान शेतकऱ्यांसाठी ३६ अश्वशक्तीपेक्षा कमी क्षमतेचा ट्रॅक्टर पुरेसा आहे, तर मोठ्या शेतकऱ्यांनी ४० अश्वशक्ती किंवा त्याहून अधिक क्षमतेचा ट्रॅक्टर विचारात घ्यावा.

अश्वशक्ती आणि इंजिन क्षमतेकडे लक्ष : २०-३० एचपी श्रेणी असलेले ट्रॅक्टर सामान्यतः लहान शेतांसाठी योग्य मानले जातात, मध्यम आकाराच्या शेतकऱ्यांसाठी ३५-४५ एचपी आणि ४५ एचपीपेक्षा जास्त ट्रॅक्टर हे मोठ्या शेतकऱ्यांसाठी आणि कंत्राटी शेतीसाठी चांगले पर्याय आहेत. पिकानुसार ट्रॅक्टर निवडा : शेतकऱ्यांनी हे विशेषतः लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक पिकासाठी एकच ट्रॅक्टर योग्य नाही. उदाहरणार्थ, २५-३५ एचपी ट्रॅक्टर शेंगदाणे आणि बाजरीसारख्या हलक्या पिकांसाठी पुरेसा आहे, तर ३५-४५ एचपी ट्रॅक्टर गहू, हरभरा आणि भात यासारख्या पिकांसाठी योग्य आहे. जर तुम्ही ऊस सारखी जड पिके मोठ्या प्रमाणात घेत असाल, तर ४५ एचपी किंवा त्याहून अधिक क्षमतेचा ट्रॅक्टर निवडा. इंधन क्षमता आणि मायलेज : डिझेलच्या वाढत्या किमती पाहता, ट्रॅक्टर मायलेज हा शेतकऱ्यांसाठी एक प्रमुख मुद्दा बनला आहे, कारण जास्त मायलेज असलेल्या ट्रॅक्टरमुळे दीर्घकाळात ऑपरेटिंग खर्च कमी होतो. म्हणून, ट्रॅक्टर खरेदी करताना, त्याची इंधन क्षमता आणि तासाचा वापर तपासा.

# कांदा पिकाचे शेंडे पिवळे पडत असल्यास हे करा उपाय

शेतकरी मित्रानो तुम्ही जर तुमच्या शेतात कांद्याची लागवड केली असेल तर तुमच्यासाठी हा लेख महत्वाचा आहे. बऱ्याचदा कांद्याच्या रोपांचे शेंडे पिवळे पडलेले दिसतात. त्यामागची कारणे आणि उपाय कोणते आहेत ते जाणून घेतले तर होणारे नुकसान टाळता येते.

**कांद्याचे शेंडे पिवळे पडण्याची कारणे :**

१)सर्वात महत्वाचे कारण म्हणजे कांदा पिकावरील बुरशीचा प्रादुर्भाव. २) अन्नद्रव्यांची कमतरता. ३) जादा पाऊस ४) पिकांना अति पाणी पाजणे ५) हिवाळ्यात धुके पडल्यामुळे ६)कांद्याच्या मुळांची नीट वाढ न होणे ७)कांद्यावर करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे देखील कांद्याच्या पातीवर शेंड्यावर पिवळे तपकिरी चट्टे पडतात आणि त्यानंतर ते सुरकुतलेले , जळल्या सारखे दिसतात.

**असे करा उपाय :**

पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बेन्डाझिम दोन ग्रॅम अधिक कॅप्टन दोन ग्रॅम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. कांद्याच्या रोपवाटिकेतील रोपांची उगवण झाल्यानंतर पंधरा दिवसातुन मॅन्कोझेब २५ ग्रॅम आधीक डायमेथोएट १५ मिली आधीक स्टिकर १० मिली प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणात दोन वेळा फवारणी करावी. कांद्याच्या रोपाची लागवड करण्यापूर्वी मॅन्कोझेब २५ ग्रॅम आणि कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लागवड करावी. कांदा वरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाची लक्षणे दिसतात १० ते १५ दिवसांच्या अंतराने मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा ट्यूबकोन्याझोल १० मिली या बुरशीनाशकांची फवारणी १० लिटर पाण्यात मिसळून करावी. या काळात फुलकिडीचा प्रादुर्भाव वाढतो त्याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट (३०%इसी ) १५ मिली किंवा लॅबडा सायहॅलोत्रीण (५%इसी) सहा मिली अधिक स्टिकर दहा मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे आलटून पालटून फवारणी करावी. कांद्याला पाणी देताना जादा पाणी देण्याऐवजी हलके पाणी द्या. कांद्याचे शेंडे पिवळे पडले असतील किंवा वाढ नीट होत नसेल तर जैविक उपाय म्हणून १५ लिटर पंपासाठी २०० मिली गोमूत्र अधिक २०० मिली दुधाची फवारणी पिकांवर करावी.

# अशी करा सुरु उसाची लागवड



राज्यात सध्या सुरू उसाच्या लागवडीसाठी शेतकरी तयारी करत आहेत. मात्र केवळ उसाची लागवड केली म्हणजे चांगले उत्पादन मिळतेच असे नाही. उसाचे भरघोस आणि दर्जेदार उत्पादन घ्यायचे असेल, तर योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खत व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे असते. मातीचे आरोग्य चांगले राहिले, तर उसाची वाढ जोमदार होते, फुटवे वाढतात आणि एकूण उत्पादनात लक्षणीय वाढ होते. त्यामुळे सुरू उसासाठी संतुलित आणि शास्त्रशुद्ध खत नियोजन करणे आवश्यक आहे.

**सूरु ऊस पिकाचे व्यवस्थापन :**

सुरुवातीला मातीतील सेंद्रिय कर्ब वाढवणे फार गरजेचे असते. उस लागवडीपूर्वी शक्य असल्यास ताग, धैंचा यासारखी हिरवळीची पिके घेऊन ती जमिनीत मिसळावीत. यामुळे मातीची सुपीकता वाढते. जर हिरवळीची पिके घेणे शक्य नसेल, तर लागवडीपूर्वी शेवटच्या पाळीच्या वेळी एकरी सुमारे १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. शेणखतामुळे जमीन भुसभुशीत होते आणि अन्नद्रव्ये धरून ठेवण्याची क्षमता वाढते.

**माती परीक्षण** : माती परीक्षणानंतर जर सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळली, तर फेरस सल्फेट १० किलो, झिंक सल्फेट ८ किलो, मँगनीज सल्फेट ४ किलो आणि बोरॅक्स २ किलो प्रति एकर या प्रमाणात वापर करावा. ही सर्व खते शेणखतात १०:१ या प्रमाणात मिसळून ५ ते ६ दिवस मुरवावीत आणि लागवडीपूर्वी सरीत टाकावीत. तसेच हुमणी अळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी लागवडीच्या वेळी एकरी सुमारे ८०० किलो निंबोळी पेंड सरीत मिसळणे फायदेशीर ठरते.

**खतांचे योग्य नियोजन :**

सेंद्रिय खतांसोबतच रासायनिक खतांचे योग्य नियोजनही तितकेच महत्त्वाचे आहे. सुरू उसासाठी हेक्टरी सुमारे २५० किलो नत्र, ११५ किलो स्फुरद आणि ११५ किलो पालाश आवश्यक असते. ही खत मात्रा सरळ खतांच्या स्वरूपात किंवा मिश्र खतांच्या स्वरूपात देता येते.

**लागवड करताना खताची मात्रा :**

सरळ खतांच्या पद्धतीत लागवडीच्या वेळी हेक्टरी ५४ किलो युरिया, ३७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. लागवडीनंतर ६ ते ८ आठवड्यांनी २१७ किलो युरिया द्यावा. त्यानंतर १२ ते १६ आठवड्यांनी पुन्हा ५४ किलो युरिया द्यावा. मोठ्या बांधणीच्या वेळी २१७ किलो युरिया, ३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ९१ किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.

**मिश्र खतांचा वापर :**

मिश्र खतांच्या पद्धतीत १०:२६:२६ हे खत वापरले जाते. या पद्धतीत हेक्टरी एकूण ४४६ किलो युरिया आणि ४४३ किलो १०:२६:२६ मिश्र खत लागते. लागवडीच्या वेळी ४ किलो युरिया आणि २३१ किलो १०:२६:२६ द्यावे. ६ ते ८ आठवड्यांनी २१७ किलो युरिया, १२ ते १६ आठवड्यांनी ५४ किलो युरिया द्यावा. मोठ्या बांधणीच्या वेळी १७१ किलो युरिया आणि २१२ किलो १०:२६:२६ खत द्यावे. एकूणच योग्य पद्धतीने सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा समतोल वापर केल्यास उसाची वाढ जोमदार होते, फुटव्यांची संख्या वाढते आणि उत्पादनात मोठी सुधारणा दिसून येते. त्यामुळे माती परीक्षण करून, सेंद्रिय खतांचा वापर वाढवून आणि शिफारशीनुसार खत मात्रा दिल्यास सुरू उसाचे भरघोस उत्पादन नक्कीच मिळू शकते.




## जागतिक दिवस
## राष्ट्रीय आलिंगन दिन

### महत्वाच्या घटना

१९०१ : राणी व्हिक्टोरियाच्या निधनानंतर ७ वा एडवर्ड हा इंग्लंडचा राजा झाला.
१९२४ : रॅम्से मॅकडोनाल्ड इंग्लंडचे पंतप्रधान बनले. ब्रिटनमधे मजूरपक्ष प्रथमच सत्तेवर आला.
१९४७ : भारतीय घटनेची रुपरेषा कशी असावी याविषयीचा ठराव घटना समितीत मंजूर
१९६३ : डेहराडून येथे अंधांसाठी राष्ट्रीय ग्रंथालय स्थापन केले.
१९७१ : सर्व मित्र सिकरी यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९२ : रॉबर्टा बॉन्डर या अवकाशात जाणाऱ्या पहिला महिला ठरल्या.
१९९९ : ऑस्ट्रेलियन धर्मप्रसारक ग्रॅहॅम स्टेन्स व त्याच्या दोन मुलांची ओरिसाच्या केओंझार जिल्ह्यातील मनोहरपूर येथे मोटारीत जाळून हत्या करण्यात आली.
२००१ : 'आय. एन. एस. मुंबई' ही क्षेपणास्त्रवाहू नौका भारतीय नौदलात समारंभपूर्वक दाखल झाली.
२००६ : इवा मोराल्स यांनी बोलीवियाचे नवीन राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतली.
२०१५ : बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेची स्थापना विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पानिपत हरियाणा येथे झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६१ : सर फ्रँन्सिस बेकन - इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (मृत्यू: ९ एप्रिल १६२६)
१८७७ : आसाम चे प्रमुख कार्यकर्ते तरुण राम फुकन यांचा जन्म.
१८९२ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक ठाकुर रोशन सिंह यांचा जन्म.
१८९६ : कवी सुर्यकांत - त्रिपाठी उर्फ निशाला यांचा जन्म.
१८९७ : भारताचे प्रसिद्ध गायक दिलीप कुमार रॉय यांचा जन्म.
१८९९ : हिंदुस्तानी संगीतज्ज्ञ दिलीप कुमार रॉय यांचा जन्म.
१९०९ : यू. थांट - संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (मृत्यू: १९७४)
१९११ : मराठी लेखक अनिरुद्ध घनश्याम रेळे यांचा जन्म.
१९१६ : हरिलाल उपाध्याय गुजराथी लेखक, कवी व ज्योतिषी (मृत्यू: १५ जानेवारी १९९४)
१९१६ : सत्येन बोस बंगाली व हिन्दी चित्रपट दिग्दर्शक व पटकथालेखक, चलती का नाम गाडी
१९२० : प्रा. ह. श्री. शेणोलीकर - संतसाहित्याचे अभ्यासक.
१९२२ : मराठी लेखिका शांता बुध्दिसागर यांचा जन्म.
१९३४ : विजय आनंद - हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २३ फेब्रुवारी २००४)
१९४९ : त्रिपुरा चे माजी मुख्यमंत्री माणिक सरकार यांचा जन्म.
१९५८ : दोस्ती १९६४, रात और दिन १९६७, आंसू बन गये फूल १९६९, जीवन मृत्यू १९७० हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. (मृत्यू: १९९३)
१९७३ : अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने गर्भपाताला मान्यता दिली, कोणतीही महिला गर्भवती असताना ६ महिन्यांपर्यंत गर्भपात करू शकते.
१९९६ : कॅलिफोर्निया च्या वेधशाळेतील शास्त्रज्ञांनी पृथ्वी पासून ३,५०,००० प्रकाश वर्ष इतक्या अंतरावर असलेल्या दोन नवीन ग्रहांचा शोध लावला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९७ : योगी चांगदेव समाधिस्थ
१६६६ : ५ वा मुघल सम्राट शहाजहान याचे आपल्याच मुलाच्या (औरंगजेब) कैदेत १० वर्षे राहिल्यानंतर निधन (जन्म: ५ जानेवारी १५९२)
१६८२ : समर्थ रामदास स्वामी (जन्म: ६०८)
१७९९ : होरॅस बेनेडिट्ट डी सास्युरे - ऑस्ट्रियन उमराव, डॉक्टर आणि
१९०१ : व्हिक्टोरिया - इंग्लंडची राणी, हिने ६३ वर्षे आणि २१६ दिवस इंग्लंडवर राज्य केले. हिच्या कारकिर्दीत इंग्लंडच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नसे अशी ख्याती होती. व्हिक्टोरिया राणीच्या काळातच भारत इंग्लंडचा गुलाम झाला. (जन्म: २४ मे १८१९)
१९६७ : डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे - क्रांतिकारक, विद्वान, कृषीतज्ञ, इतिहासकार आणि 'गदर पार्टी' चे शिल्पकार (जन्म: ७ नोव्हेंबर १८८४)
१९७२ : स्वामी रामानंद तीर्थ हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य चळवळीचे नेते, समाजसुधारक आणि शिक्षण तज्ञ (जन्म: ३ आक्टोबर १९०३)
१९७३ : लिंडन बी. जॉन्सन - अमेरिकेचे ३६ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २७ ऑगस्ट १९०८)
१९७५ : 'काव्यविहारी' धोंडो वासुदेव गद्रे - केशवसुत संप्रदायी आधुनिक कवी (जन्म: १६ नोव्हेंबर १८९४)
१९७८ : हर्बर्ट सटक्लिफ - इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २४ नोव्हेंबर १८९४)
२००४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री मेनका देवी यांचे निधन.



गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# आरोग्य कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

## शासन आदेशान्वये कायम सेवेची संधी हेतुपूरस्सर डावलल्याचा आरोप

अंबड (प्रतिनिधी)

शासन आदेशान्वये कायम सेवेची संधी मिळणे अपेक्षित असलेल्या जिल्ह्यातील १० कंत्राटी कर्मचाऱ्यांची नौकरी संबधितांनी कटकारस्थान रचून डावलल्याचा गंभीर आरोप करत सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषीवर कारवाई करत आपणास न्याय देण्यात यावा, या मागणीसाठी प्रशासकीय कारभारास वैतागलेले आरोग्य कर्मचारी इरफान बद्रोहीन शेख यांनी प्रजासत्ताक दिनी (दि. २६) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा ईशारा दिला आहे.

याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अर्जात इरफान बद्रोहीन शेख (रा.शेवगा,ता.अंबड) यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, जालना यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले असून, शासन आदेशानुसार आपल्याला कायम सेवेत समावेश होण्याची संधी असतांनाही ती संधी जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याचे त्यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे. या प्रकारामुळे संबंधित जिल्ह्यातील १० कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असून त्यांना न्याय मिळावा, यासाठी त्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबल्याचे स्पष्ट केले आहे. इरफान शेख यांनी यापूर्वी १२ डिसेंबर २०२५ रोजी आपल्या तक्रार अर्जाची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात केली होती. त्या अर्जात त्यांनी नमूद केले की, जिल्हा शल्यचिकित्सक जालना यांनी कटकारस्थान करून शासनाने आपल्याला दिलेली कायम सेवेची संधी डावलली आहे. शासन निर्णय, नियम व अटींचे उल्लंघन करून काही विशिष्ट व्यक्तींना लाभ देण्यात आल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात शेख यांनी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथील मा.आयुक्त आरोग्य सेवा यांच्याकडेही लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी अहवालाची प्रत अर्जदारास पाठवावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली होती.मात्र मोठा कालावधी लोटूनही या प्रकरणी कोणताही प्रतिसाद किंवा लेखी उत्तर मिळाले नसल्याने अर्जदारांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून याकडे गांभीयनि पाहिले जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित कर्मचारी न्यायापासून वंचित राहात आहे. शासन स्तरावर तक्रार दाखल करूनही दखल घेतली जात नसेल, तर सामान्य नागरिकाने न्याय कुठे मागायचा, असा सवाल शेख यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणामुळे प्रभावित झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्नही ऐरणीवर आला असून अनेक वर्षे सेवा बजावल्यानंतर शासन आदेशानुसार कायम सेवेत सामावून घेण्याची अपेक्षा असताना, कथित कट कारस्थानामुळे त्यांची संधी हिरावून घेतली गेल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले असून शेख यांनी स्पष्ट केले आहे की, न्याय मिळविण्यासाठी त्यांनी सर्व कायदेशीर व प्रशासकीय मार्ग अवलंबून पाहिले. मात्र,कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी लोकशाही मागनि आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यानुसार प्रजासत्ताक दिनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय मार्गाने आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

या उपोषणाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून घेऊन संबंधित प्रकरणाची तात्काळ चौकशी सुरू करावी, दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच अन्यायग्रस्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन आदेशानुसार कायम सेवेचा लाभ द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.



# शहरातील प्रत्येक समस्या सोडवणे हा आमचा संकल्प –भास्कर आबा दानवे

जालना । प्रतिनिधी

माझ्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व कल्याण भदनेकर आम्हाला मोठ्या मताधिक्यांनी आपण निवडून दिले असून, नागरिकांचा विश्वासच आपली खरी ताकद असल्याचे आहे. येणाऱ्या काळात प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या समस्या सोडवून प्रभाग क्रमांक १ चा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे आश्वासन भास्कर आबा दानवे यांनी दिले.

जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर आबा दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने वैभव कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्पष्ट केले की, प्रभाग क्रमांक १ चा विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून, प्रत्येक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यावेळी प्रतिक भैय्या दानवे, जीवन सले, रवी सले, अजित मानधनी आदी यांच्यासह प्रभागातील सांगळे काका-काकू, भाऊराव फदाट, शामराव राठोड, निवरकर साहेब, सुशीलकुमार बेघानी, शेख साहेब, काळे साहेब, कपिल दहेकर,मनोज भैय्या वाघ, भरत निवरकर, बबलू टेकाळे, गजानन बागल, विकास राठोड, रवी जाधव, विशाल फदाट, राहुल जामुंदे, सौरभ उंद्रे व आदित्य उगले आदींची उपस्थिती होती.

# महानगर पालिकेकडून अतिक्रमणावर थेट कारवाई अंकुश कोचिंग क्लासेसच्या संचालकावर गुन्हा दाखल

जालना प्रतिनिधी

महापालिकेच्या धडाकेबाज कारवाईत अंकुश कोचिंग क्लासेसच्या संचालकावर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला. गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अतिक्रमण प्रकरणी अखेर प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहेत. आझाद मैदान परिसरातील अंकुश कोचिंग क्लासेसचे संचालक आणि अतिक्रमणधारक अंकुश रामराव सोनवणे यांच्या विरोधा सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेख शकील यांनी या अतिक्रमणाविरोधात प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत सूचना देऊनही संबंधिताने अतिक्रमण काढले नव्हते. वारंवार पाठपुरावा



केल्यानंतर, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम आणि मालमत्ता अधीक्षक राहुल देशमुख यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सूचना दिल्यावर, सोनवणे यांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याचे आश्वासन दिले होते. दिलेली मुदत उलटून गेल्यानंतरही आणि जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा सूचना देऊनही अतिक्रमण धारकाने स्वतःहून अतिक्रमण काढले नाही. प्रशासनाच्या आदेशाचा अवमान केल्यामुळे जिल्हाधिकारी, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड आणि सहाय्यक उपायुक्त सुप्रिया चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे आदेश देण्यात आले. अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख बी. सी. राठोड यांच्या आदेशान्वये, सहाय्यक अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख तथा अनाधिकृत बिल्डिंग निरीक्षक शामसन कसबे यांनी पोलीस ठाण्यात जाऊन कायदेशीर तक्रार नोंदवली. त्यानुसार अंकुश रामराव सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अतिक्रमणधारकांना प्रशासनाचा इशारा**

शहरातील कोणत्याही सार्वजनिक जागेवर किंवा शासकीय जमिनीवर केलेले अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही. ज्यांना सूचना दिल्या आहेत, त्यांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा अशाच प्रकारे फौजदारी गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# उमेदवारांना इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण बंधनकारक

परभणी । प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांसह राजकीय पक्षांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणीकरण करून घेणे बंधनकारक आहे. यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी



अधिकारी रश्मी खांडेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिता भालेराव, उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, शैलेश लाहोटी, उदयसिंह भोसले, संगीता चव्हाण, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) विद्या मुंढे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शोभादेवी जाधव उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार दूरदर्शन, उपग्रह व केबल वाहिन्या, यूट्यूब चॅनेल, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृक्?श्राव्य फलक, ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉइस एसएमएस, समाज माध्यमे व संकेतस्थळांवरील निवडणूक जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण आवश्यक आहे असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी सांगितले. निवडणुका निर्भय, मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयासह जबाबदारीने कामे करावेत, असे निर्देश दिले. निवडणूक काळात होणारे अवैध आर्थिक व्यवहार, रोकड वाहतूक, भेटवस्तू वाटप तसेच संवेदनशील व अतिसंवेदनशील भागांवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी चव्हाण यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. कोणताही अनुचित प्रकार आढळून आल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस विभागाने चोख बंदोबस्त ठेवावा. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू तयार करणारे तसेच विना परवाना विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहिमा राबवून कडक कारवाई करावी, असे सांगितले.

# देहविक्री करणाऱ्या दोन पीडितांची सुटका

धाराशिव । प्रतिनिधी

वासी तालुक्यातील पारगाव येथील पृथ्वीराज हॉटेल व लॉजमध्ये सुरू असलेल्या अवैध देहविक्री व्यवसायाचा वाशी पोलिसांनी धडक कारवाईत पर्दाफाश केला. या कारवाईत दोन पीडित मुलींची सुखरूप सुटका करण्यात आली असून, हॉटेल मालकासह कामगार व चार ग्राहकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पारगाव येथील पृथ्वीराज बियर बारच्या वरच्या मजल्यावर असलेल्या लॉजमध्ये अवैध वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्रीलायक माहिती वाशी पोलिसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने दि. १९ जानेवारी रोजी रात्री छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान देहविक्रीचा प्रकार



सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तत्काळ कारवाई करण्यात आली. या कारवाईत हॉटेल मालक श्रीपती उत्तमराव घुले, कामगार महादेव विष्णू काळे तसेच चार संबंधित ग्राहकांना ताब्यात घेण्यात आले. सुटका करण्यात आलेल्या पीडित मुलींची वैद्यकीय तपासणी करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले असून त्यांचे समुपदेशन व पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलिस अधीक्षक शफकत आमना व उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वाशी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक शंकर शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोटच्या मुलीची हत्या करणाऱ्या महिलेला न्यायालयीन कोठडी

लातूर । प्रतिनिधी

पती कामावरून वेळेत परत न आल्यामुळे पोटच्या दीड वर्षांच्या मुलीचा चाकूने सपासप वार करून जन्मदात्या आईनेच क्रूरपणे खून केल्याची घटना सोमवारी पहाटे लातूरमध्ये घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी महिलेला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता तिला न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले.

लातूर शहराजवळील बारा नंबर पाटी परिसरातील श्यामनगरमध्ये विक्रम चौगुले (वय ३४, रा. हासेगाव तालुका कळंब) दोन महिन्यांपासून कामानिमित्त पत्नी अश्विनी (वय ३०), चार एक वर्षांचा मुलगा व दीड वर्षांच्या नंदिनी या मुलीसह राहतात. ते ट्रॅक्टर चालक आहेत. रविवारी उसाने भरलेले ट्रॅक्टर रिकामे करण्यासाठी विक्रम चौगुले औसा तालुक्यातील भोसा येथे गेले होते. रात्री परत येण्यास उशीर झाल्यानंतर त्यांची पत्नी अश्विनीने फोन करून आत्ताचे आत्ता घरी या नाहीतर मुलीला मारते अशी धमकी दिली. पतीने सकाळी घरी येतो म्हणून सांगितले होते. मात्र राग अनावर झाल्याने अश्विनीने दीड वर्षांच्या चिमुरडीवर चाकूने अनेक वार केले. तोंड, पोटात, छातीत आणि गुप्तांगावर चाकूने वार झाल्यामुळे चिमुरडी गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाली. दरम्यान, सोमवारी सकाळी उशिरापर्यंत दरवाजा न उघडल्याने शेजाऱ्यांनी आवाज देऊनही दरवाजा उघडला नाही. शेवटी सकाळी दहाच्या सुमारास पती विक्रम चौगुले आले असता दरवाजा उघडण्यात आला तेव्हा दीड वर्षांची चिमुकली रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिला तातडीने उचलून दवाखान्यात नेण्यात आले मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता.

# टिप्परसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली । प्रतिनिधी

बोल्डा ते वाई मार्गावर मरसुळ शिवारात कुरुंदा पोलिसांच्या पथकाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी टिप्पर चालका विरुध्द मंगळवारी कुरुंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी टिप्पर चालकास ताब्यात घेतले आहे.




जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली असून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी महसूल विभाग तर पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी पोलिस विभागाची पथके सतर्क केली आहेत. या पथकांना खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनंतर तातडीने कारवाई केली जात आहे. दोन दिवसांपुर्वीच औंढा नागनाथ पोलिसांच्या पथकाने रुपुर शिवारात पूर्णा नदीच्या पात्रातून तीन जेसीबी, तीन ट्रॅक्टर असा ८९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १६ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, त्यानंतर बोल्डा ते वाई मार्गावर नांदेड कडून एका टिप्परमध्ये वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून जमादार संदीप पवार, सतीश नरवाडे, सुमीत टाले, विनोद कुटे यांच्या पथकाने तातडीने बोल्डा ते वाई मार्गावर मरसुळ शिवारात वाहनांची तपासणी सुरू केली. यावेळी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास नांदेडकडून वाळू घेऊन एक टिप्पर येत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी टिप्पर थांबवून चालक सचिन मोरे (रा. शाहूनगर, हडको, नांदेड) याची चौकशी केली. मात्र त्याच्याकडे वाळू वाहतूकीचा परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून पोलिसांनी वाळू व टिप्पर असा २० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# कन्नड तालुक्यातील जामडी फॉरेस्टमधील खुनाचा गुंतागुंतीचा गुन्हा उघड

कन्नड / प्रतिनिधी

तालुक्यातील जामडी फॉरेस्ट शिवारात घडलेल्या खुनाच्या क्लिष्ट गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा व ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला असून, या प्रकरणात आई-मुलाने मिळून खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

१३ जानेवारी रोजी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत जामडी फॉरेस्ट गावालगतच्या वनभागात एक अनोळखी प्रेत आढळून आले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पोलीस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पाहणीत सदर मृतदेहाची ओळख जामडी गावातील नागरिकांनी पटवून दिली. मृताचे नाव राजू रामचंद्र पवार (रा. जामडी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) असे निष्पन्न झाले.

मयताचा नातेवाईक प्रकाश रामचंद्र पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ०८/२०२६, कलम १०३(१), २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड व अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांनी घटनास्थळी भेट देत तपासासाठी तातडीच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके व कन्नड ग्रामीण सपोनि रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस एक पथक तपासात उतरले. तपासादरम्यान घटनास्थळाच्या आसपास झाडाझुडपे, नाले व शेतात बारकाईने शोध घेतला




असता मृताच्या अंगावरील अंडरपँट, फुटलेला मोबाईल व चप्पल काही अंतरावर वेगवेगळ्या ठिकाणी आढळून आले. त्यामुळे तपासाची दिशा अधिक गहिरी झाली. १३ ते २० जानेवारी या कालावधीत तब्बल आठ दिवस तपास करत ५० हून अधिक संशयितांची चौकशी करण्यात आली. मात्र ठोस माहिती मिळत नव्हती. अखेर मयत हा बंजारा समाजातील असल्याने त्या समाजाची भाषा जाणणाऱ्या गोपनीय बातमीदारांच्या मदतीने माहिती गोळा करण्यात आली. घटनास्थळालगतचे शेत राजू जोधा पवार यांचे असून, ते शासकीय सेवेत असल्याने शेती पत्नी वंदना पवार व मुलगा धीरज उर्फ टेमा कसत असल्याची माहिती मिळाली. चौकशीत वंदना पवार संशयास्पदरीत्या माहिती लपवत असल्याचे निदर्शनास आले. सखोल चौकशीनंतर तिने गुन्ह्याची कबुली दिली. वंदना पवार हिने सांगितले की, मयत राजू पवार तिच्याकडे वारंवार शारीरिक संबंधाची मागणी करत होता. या त्रासाला कंटाळून तिने मुलगा धीरज याच्यासह खुनाचा कट रचला. १३ जानेवारी रोजी सकाळी तिने राजू पवार याला शेताकडे बोलावले. झाडीत आल्यानंतर मुलाने त्याच्या डोक्यात मारले व वंदनाने त्याचे गुप्तांग दाबून त्याचा खून केला. नंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह वन भागातील नाल्यात झाडाच्या मुळाखाली लपवून ठेवला. दिशाभूल करण्यासाठी अंडरपँट, चप्पल व मोबाईल वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिले. तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली की, आरोपी मुलगा धीरज उर्फ टेमा याने क्राइम पेट्रोल, सीआयडी व 'दृश्यम' चित्रपट पाहून संपूर्ण कटाची आखणी केली होती. या प्रकरणात आरोपी वंदना राजू पवार (वय ४५) व तिचा मुलगा धीरज उर्फ टेमा राजू पवार (वय १८, रा. जामडी फॉरेस्ट) यांना अटक करण्यात आली असून, दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली आहे. पुढील तपास कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे करत आहे. या गुन्ह्याचा यशस्वी तपास पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री, पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत तसेच स्थानिक गुन्हे शाखा व कन्नड ग्रामीण सपोनि रामचंद्र पवार, आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडला. आठ दिवस अखंड तपास, गोपनीय बातमीदारांचा वापर व तांत्रिक माहितीच्या आधारे हा अत्यंत कठीण व गुंतागुंतीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयात मरणोत्तर देहदान

धाराशिव । प्रतिनिधी

समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे आठवे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पार पडले. ईटकूर (ता. कळंब) येथील ६५ वर्षीय आशाबाई गोविंद गंभीरे यांचे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या जिवंतपणी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार व पूर्वी केलेल्या संकल्पानुसार त्यांचे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे करण्यात आले.

कै.आशाबाई गंभीरे व त्यांचे पती गोविंद गंभीरे या वृद्ध दाम्पत्याने जिवंतपणीच देहदानाचा संकल्प केला होता. पत्नीच्या निधनानंतर पती गोविंद गंभीरे यांनी हा संकल्प प्रत्यक्षात उतरवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी मोलाची मदत होणार आहे. या देहदानामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना शरीररचना अभ्यास व संशोधनासाठी उपयुक्त संधी मिळणार असून, भविष्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे.शरीररचनाशास्त्र विभागाच्या नियोजनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया पार पडली. या कार्यात डॉ.स्वाती पांढरे, डॉ. विश्वजीत पवार, डॉ.सुवर्णा आनंदवाडीकर,डॉ. नितीन भोसले, डॉ. विवेक कोळगे, डॉ.अरबाज ढवळीकर, अधिसेविका सुमित्रा गोरे, प्रशांत बनसोडे, वरिष्ठ लिपिक जीवन गंभीरे तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. संपूर्ण प्रक्रियेसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी देहदान करणाऱ्या गंभीरे कुटुंबीयांचे विशेष आभार मानले.

# चौदा वर्षाच्या मुलीचा अम्ला गावात बालविवाह रोखला

## मानवी वाहतूक विरोधी शाखेने मुलीला ताब्यात घेवून तलवाडा येथे केला गुन्हा दाखल




**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील आमला येथे दिनांक ५ जानेवारी रोजी बालविवाह झाल्याची माहिती अ मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेला मिळाल्यावर त्यांनी दिनांक १९ जानेवारी रोजी सोमवारी या ठिकाणी जाऊन मुलगा त्याच्या आई वडील मुलीचे आई-वडील आणि मुलीला ताब्यात घेऊन तलवाडा पोलीस ठाण्यात हजर केले.**

दिनांक १९/०१/२०२६ सोमवारी सकाळी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी अधिकारी, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दिनांक ०५/०१/२०२६ रोजी आम्ला ता. गेवराई जि. बीड येथे एका १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह झाला आहे व तिथेच आज सत्यनारायणाची पूजा आहे. त्यावरून, टीम अम्ला गावात दाखल झाली. मिळालेल्या माहितीनुसार बालविवाह झालेल्या घरी टीम गेली असता, पोलीस आल्याचे बघून सर्व पाहुण्यांनी इकडे तिकडे सैरा वैरा पळू लागले. व मुलीला कुठेतरी लपवून ठेवले. पल्लवी जाधव यांनी मुलीचा घरात व इतरत्र शोध घेतला पण ती मिळून आली नाही. इथे बालविवाह झालाच नाही असा घरातल्या लोकांनी बनाव केला. विवाह झालेला व्यक्ती पळ काढेल तोच त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता इथे काही झालेच नाही किंवा मी तो व्यक्ती नाहीच अस तो दाखवत होता. परंतु पल्लवी जाधव यांच्याकडे लग्न झाल्याचा पुरावा असल्याबाबत सांगितले व लग्नाचा फोटो माझ्याकडे आहे असे सांगितले. मग त्याने घाबरून कबुली दिली. सदर व्यक्तीचे नाव कृष्णा उर्फ बबन अनुरुद्र वरबडे वय ३० वर्ष रा. आम्ला ता. गेवराई जि. बीड असे सांगितले. तसेच पिडीत मुलगी ही १४ वर्षाची असून माझ्या मामाची मुलगी आहे असे सांगितले. सुमारे एक तासानंतर मुलीला पल्लवी जाधव यांच्या समक्ष हजर केले. सदर मुलगी खूप घाबरलेली होती . तिला जवळ घेवून, विश्वासात घेवून तिची विचारपूस केली. व तिचे समुपदेशन केले. त्यांनतर पल्लवी जाधव यांनी गावचे सरपंच व ग्रामसेवक यांना घटनास्थळी बोलावून घेतले व त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. तसेच त्यांनी तिथे हजर असलेल्या सर्व नातेवाईक मंडळी व गावातील नागरिकांना बालविवाह कायदा व बालविवाहाचे मुलींवर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत माहिती देवून जनजागृतीपर मार्गदर्शन केले. त्यानंतर सदर पीडित मुलगी व बालविवाह करणारा कृष्णा उर्फ बबन वरबडे तसेच त्याचे आई वडील यांना ताब्यात घेवून, पुढील कारवाई साठी पोस्टे ला हजर केले व मुलीचे आई वडील यांना फोन करून पोस्टे ला हजर राहण्यास सांगितले . ग्रामसेवक यांना बालविवाह झाले बाबत गुन्हा दाखल करण्यास सांगितले. तसेच पोस्टेच्या महिला अंमलदारांना पीडित मुलीला तिच्या आईवडिलांसोबत बालकल्याण समिती समोर हजर करणेबाबत सूचना दिल्या. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर, यांच्या मार्गदर्शनाखाली, पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे , पोशी योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# शासकीय कर्मचाऱ्यांना सक्ती करून झाली आजपासून शहरात नागरिकांनाही हेल्मेटची सक्ती

**बीड । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा सप्ताहा निमित्त पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना हेल्मेटची सक्ती करण्यात आली होती. दोन दिवस शासकीय कर्मचाऱ्यावर कारवाई झाल्यानंतर आता आज पासून सर्वसामान्य नागरिकांनाही शहरांमध्ये हेल्मेटची सक्ती करण्यात येणार आहे. यासंदर्भात शाळा महाविद्यालयात जाऊन जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांना, तरुणांना मार्गदर्शन



करण्यात आले. याचवेळी त्यांनी आज पासून शहरात हेल्मेट सक्ती होणार असल्याचे जाहीर केले.

रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी टाळण्यासाठी आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा वाहतूक शाखा, बीड यांच्या वतीने बीड शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना हेल्मेट वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या वेळी विद्यार्थ्यांना हेल्मेट न वापरल्यास होणारे गंभीर परिणाम, अपघाताच्या वेळी डोक्याला होणाऱ्या जखमा तसेच योग्य दर्जाचे हेल्मेट वापरण्याचे फायदे समजावून सांगण्यात आले. "हेल्मेट हे केवळ कायद्याची अट नसून जीवनरक्षक कवच आहे," असे सांगत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

जिल्हा वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, उद्यापासून विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या ◀◀ पान ३ वर

# स्वच्छता, लाइट, पाणी, रस्त्यासाठी तुतारी गट आक्रमक आज मागणी करतोय उद्या संघर्ष करू- खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील स्वच्छता. लाईट. पाणी व शहरातील रस्ते विकास व इतर विविध मागण्या संदर्भात आज तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांच्या अध्यक्षतेखाली दुबार मुख्याधिकाऱ्याची बैठक घेण्यात आली असून मुख्याधिकारी श्री फडसे साहेबांनी सदर बैठकीला प्रतिसाद दिले आहे, नागरिकांच्या समस्या संदर्भात तुतारी गटाने ही दुसरी बैठक घेतली असून मुख्याधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करून निवेदनात



म्हटले आहे की बीड शहरातील रस्त्यांची कामे त्वरित सुरू करावे, वेळेवर पिण्याचे पाणी द्यावे. शहर स्वच्छतेसाठी विशेष लक्ष द्यावे, खंब्यावरील लाईट सुरळीत करावे, मोमीनपुरा नालेचा पाणी बार्शीनाका चौक मार्गे बिंदूसरा नदित सोडावे, धांडे नगर नर्सरी नाला बलगुजार मधुनच रेल्वे पुलाच्या बाजुने बिंदूसरा नदित सोडावे, अंगणवाड्या किंवा बालवाडया सुरू करावे, मुकाट कुत्रे व इतर जनावरेचा बंदोबस्त करावे, आठवडी बाजारामुळे सुभाषरोड जाम होतो यशवंत उद्यानाचे उत्तर बाजु किंवा संताबाई पुल ते मोंढा पुल रस्त्यावर जागा उपलब्ध करावे, बिंदुसरा नदी चे सुशोभीकरण करावे, गरिबांना प्रधान्य देऊन घरकुले देण्यात यावी तसेच घरकुलाचे थकीत हप्ते लवकरात लवकर देण्यात यावे, खासबाग ते मोमीनपूरा पुलाचे काम त्वरीत सुरु करावे, डाग बंगला शादी खाना दुरूस्त ◀◀ पान ३ वर

# कोरेगावमध्ये बीडच्या उसतोड मजूराचा खून

**कोरेगाव । प्रतिनिधी**

**कोरेगाव तालुक्यातील भोसे येथे एका ऊसतोड मजुराचे पाय बांधून दगडाने डोके ठेचून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी उघडकीस आली. मच्छिंद्र अंबादास भोसले (वय ४२, रा. उखळवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड) असे मृत मजुराचे नाव असून या प्रकरणी अजय राजेंद्र माने (रा. भोसे, ता. कोरेगाव) याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

खुनानंतर आरोपीने स्वतःही विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली आहे.मच्छिंद्र भोसले हे गेल्या तीन-चार वर्षांपासून जरंडेश्वर शुगर मिलसाठी ऊसतोडणीचे काम करत होते. १५ जानेवारी रोजी रात्री आरोपी अजय माने याने मच्छिंद्र यांना हॉटेलमध्ये जेवायला नेतो असे सांगून आपल्या शेतात नेले. तिथे त्यांचे पाय बांधून दगडाने डोके ठेचून त्यांची हत्या केली आणि मृतदेह उसाच्या शेतात फेकून दिला. पती घरी न परतल्याने त्यांच्या पत्नीने १७ जानेवारीला कोरेगाव पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. मंगळवारी सकाळी आरोपीच्या वडिलांना शेतात मृतदेह आढळल्यानंतर या भीषण गुन्ह्याचा उलगडा झाला. या घटनेची माहिती मिळताच बीड जिल्ह्यातील मजूर आणि नेत्यांनी जरंडेश्वर कारखाना परिसरात धाव घेऊन ठिय्या आंदोलन केले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कारखाना परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले करत आहेत. आरोपी सध्या रुग्णालयात उपचार घेत असल्याने खुनाचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.



## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाला राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक

माजलगाव । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १८ जानेवारी उदगीर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ १९ वर्ष वयोगटातून राज्यात तृतीय आला आहे, या स्पर्धेमध्ये छ. संभाजीनगर विभागाचा पहिला सामना नागपूर विभागाशी झाला, अगदी सरळ २-० ने हा सामना जिंकून सेमीफायनल चा ◀◀ पान ३ वर

# ग्रामीण भागातील नर्सेसचे प्रश्न सोडविण्याकरता वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून मिळाले आश्वासन - राधा जाधव

बीड । प्रतिनिधी

माननीय अप्पर आयुक्त आस्थापना छत्रपती संभाजी नगर यांच्या सूचनेनुसार माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होणारी बैठक विभाग प्रमुख तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी घ्यावी अशा सूचना माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्यानुसार सदरील बैठक जिल्हा आरोग्य अधिकारी माननीय डॉक्टर उल्हास गंडाळ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झाली.बीड



जिल्ह्यातील आरोग्य सेविकेचे कंबरडे मोडले तरी शासनाला आरोग्य सेवेचा कणा ताठ पाहिजे राधा जाधव यांनी प्रशासनाला प्रश्न केला आहे या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली या वेळी संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते संघटनेला मार्गदर्शन ◀◀ पान ३ वर

# रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करा : डीवायएफआय युवक संघटनेचे सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयावर निदर्शने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई,मोहा - सिरसाळा हा राज्य रस्ता व परळी - नागापूर - बोधेगाव - मोहा हा जिल्हा रस्ता गेल्या अनेक दिवसापासून रहदारीसाठी नादुरुस्त झाला असून,त्यामुळे शेतकरी,विद्यार्थी, युवक जनसामान्यांच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तीन वर्षापासून रस्ता मंजूर असूनही प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे अजूनही रस्ता दुरुस्त केला नाही.त्याचबरोबर मुकुंदराज समाधी कडील रस्ता ही खूप खराब झाला आहे.त्यामुळे




अनेक अपघात झाले असून जीव गमवावा लागला आहे.त्यामुळ सदरील रस्ते तात्काळ दुरुस्त करावे या साठी भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ डी वाय एफ आय युवक संघटनेने या रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर आणून सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयावर निदर्शने करण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दोन्ही रस्त्यांचे प्रश्न दहा फेब्रुवारी पर्यंत मार्गी लावू असे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे निदर्शने तात्पुरती स्थगित करण्यात आली. जर दिलेल्या वेळेत काम सुरू झाले नाही तर कार्यालयाचा ताबा घेऊन बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला. यावेळी या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ. रवींद्र देवरवाडे, व्यंकट ढाकणे, आबा कांबळे, ◀◀ पान ३ वर

# फसवणूक झालेली रक्कम सायबर पोलिसांकडून तक्रारदारास परत

बीड । प्रतिनिधी

पैसे दाम दुप्पट करून देतो असे म्हणून पाच लाख अडतीस हजार पाचशे रुपये ऑनलाईन तर चार लाख ५० हजार रुपये रोख अशी रक्कम घेऊन जवळपास नऊ लाख ८८ हजार पाचशे रुपयांची आर्थिक फसवणूक दिगंबर चाटे यांनी केली. या प्रकरणी सायबर पोलिसांनी तपास करून ही रक्कम पोलिसांनी विलास नाईकवाडे यांना परत मिळून दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की विलास ज्ञानोबा नाईकवाडे रा. भगवान बाबा प्रतिष्ठान जवळ पिताजी आनंद आपारमेंट बीड यांना ग्लोबल कॅपिटल एफएक्स कंपनीत गुंतवणूक करून दररोज अर्धा ते एक टक्का व्याज मिळेल आणि तीन महिन्यात दाम दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून २४ फेब्रुवारी २०२५ रोजी ते दिनांक ३ एप्रिल २०२५ पर्यंत पाच लाख अडतीस हजार पाचशे रुपये ऑनलाईन ट्रान्सफर केले व चार लाख ५०



हजार रुपये नगद घेतले. हे सर्व पैसे ज्ञानेश्वर दिगंबर चाटे यांना दिल्याची तक्रार नाईकवाडे यांनी केली होती. नऊ लाख ८८ हजार पाचशे रुपयाला त्यांची आर्थिक फसवणक केल्यावर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व बँकेकडून प्राप्त माहितीवरून आरोपीचा शोध घेतला. तांत्रीक बाबी तपासून फसवणूक करणाऱ्या आरोपीचे बँक खाते गोठवून त्यावरील दोन लाख ६८ हजार रुपये एवढी रक्कम तसेच दोन लाख रोख जप्त करण्यात आले. असे एकूण चार लाख ६८ हजार रुपये रक्कम तक्रारदारास पोलीस अधीक्षकांच्या हस्ते परत करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि संदीप आराक सपोउपनि भारत जायभाये,पोह. विजय घोडके, निलेश उगलमुगले, श्रीकृष्ण टेकाळे यांच्या पथकाने केली.

# राज्याध्यक्षपदी डॉ.राजेश इंगोले तर उपाध्यक्षपदी डॉ.पल्लवी दोडके यांची नियुक्ती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीच्या राज्य अध्यक्षपदावर अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले तर उपाध्यक्षपदी परभणीच्या डॉ.पल्लवी दोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी सचिव डॉ.विक्रांत देसाई यांनी सदरील निवडीचे पत्र संबंधितांना राज्य मध्यवर्ती कार्यालया तर्फे पाठवले आहे. दमदार कामगिरीमुळे सलग चौथ्या वर्षी डॉ.राजेश इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.



इंडियन मेडिकल असोसिएशन ही डॉक्टरांची भारतातील व महाराष्ट्रातील सर्वात मोठी संघटना आहे. या संघटने द्वारे डॉक्टरांचे विविध प्रश्न,समस्या यावर डॉक्टरांना मार्गदर्शन करून मदत केली जाते तसेच संघटनेतर्फे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्न सोडविले जातात. केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारे आरोग्याच्या योजना आखत असताना इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सूचना निर्देशांचा वापर करून आरोग्याचा मसुदा आखत असते. डॉक्टरांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी ही संघटना अहोरात्र कार्यरत असते सांस्कृतिक समिती ही इंडियन मेडिकल असोसिएशनची महत्त्वाची शाखा आहे. सांस्कृतिक समितीद्वारे महाराष्ट्रातील सर्व डॉक्टरांसाठी दरवर्षी विविध सांस्कृतिक कला क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात अंबाजोगाईचे अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ.इंगोले यांना राज्य कार्यकारिणीने सलग चौथ्या वेळेस सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदाचा मान देत त्यांची नियुक्ती करीत त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे. सलग चौथ्या वेळेस राज्य समितीचे कोणत्याही समितीचा अध्यक्ष पदाचा मान पटकाविणारे डॉ.राजेश इंगोले हे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या इतिहासामध्ये पहिलेच अध्यक्ष डॉक्टर ठरलेले आहेत. डॉ.इंगोले यांच्या चार वर्षांच्या कारकिर्दीत डॉ.राजेश इंगोले यांनी सांस्कृतिक समितीद्वारे महाराष्ट्रातील डॉक्टरांसाठी गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रील्स सुपरस्टार स्पर्धा, नाट्य स्पर्धा असे विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करीत महाराष्ट्रातील सर्व डॉक्टरांसाठी एक सशक्त सांस्कृतिक व्यासपीठ तयार करून दिले. त्यांच्या या दमदार अलौकिक कामगिरीमुळे सलग चौथ्या वर्षी डॉ.राजेश इंगोले यांना हे पद देऊन राज्य कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, सचिव डॉ.विक्रांत देसाई, कोषाध्यक्ष डॉ.अमोल गित्ते तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सन्मान केला आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी डॉ.इंगोले हे एक अष्टपैलू व बहारदार व्यक्तिमत्व असून त्यांना जे पद दिले जाते त्या पदाला ◀◀ पान ३ वर

# लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात वडील व मुलास अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात वडील व मुलास बीड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.



प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, गेवराई तालुक्यातील एका गावामध्ये पीडितेने तक्रार दिली की एका इसमाने तिला स्कॉर्पिओ गाडीत बसवून स्वतःच्या घरी नेले व तिथे तिचे कपडे काढून तिला मिठी मारली व नंतर स्वतःच्या मुलाला बोलवून घेतले व मुलास सांगितले की हिच्यासोबत शारीरिक संबंध कर. तसेच तो पीडितेला म्हणाला मी तुझे लग्न माझे मुला सोबत लाऊन देतो. त्यानंतर त्या दोघांनी पीडितेला गावात शाळेजवळ सोडले व तिला धमकी दिली की झालेला प्रकार कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या आई-वडिलांना जिवंत मारून टाकू.

त्यानंतर झालेला प्रकार गावात सगळ्यांना समजेल म्हणून पीडितेने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यानंतर पीडितेच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध कलम ७४, ७५ व कलम ८ व १२ पोक्सो () कायद्याने गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दोन्ही आरोपींनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने अटकपूर्व जामीन अर्ज बीड येथील सत्र न्यायालयात ॲड. अशोक मुंडे यांच्यामार्फत दाखल केला होता. त्या गुन्हामध्ये ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक: शेवटच्या दिवशीही उमेदवारांची नावे गुप्त

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असून, अद्याप कोणत्याही प्रमुख पक्षाने अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केलेली नाही. जिल्ह्यात अनेक ठिकाणी इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी असल्याने पक्षांतर्गत नाराजी व बंडखोरीची शक्यता वाढली आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन सर्वच पक्षांनी शेवटपर्यंत उमेदवारांची नावे जाहीर केली नाहीत.



आघाडी व युतीसंदर्भातील संभमामुळे सर्वच पक्षांतील इच्छुकांनी खबरदारी म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करून ठेवले आहेत. ज्यांना अधिकृत एबी फॉर्म मिळेल, त्यांनाच पक्षाचा अधिकृत उमेदवार घोषित करण्यात येणार आहे. बंडखोरी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या ठिकाणीच एबी फॉर्म वितरित केले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उमेदवारांची अंतिम निवड उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, त्या सूचनांनुसार आज शेवटच्या दिवशी उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात येणार आहेत. पक्षाची अधिकृत यादी अंतिम क्षणीच जाहीर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांची आघाडी झाल्याची अधिकृत घोषणा मंगळवारी उशिरा करण्यात आली. या आघाडीनुसार वंचित बहुजन आघाडी जिल्हा परिषदेमधील १५ गटांमध्ये तसेच पंचायत समितीच्या ४० ते ५० जागांवर निवडणूक लढविणार आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण आणि वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय महासचिव प्रियदर्शन तेलंग यांनी ही माहिती दिली. दुसरीकडे, भाजप आणि शिवसेना युतीबाबत शेवटपर्यंत अनिश्चितता कायम होती. यासंदर्भात शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रमेश कोंडे यांनी सांगितले की, युतीसंदर्भातील प्रस्ताव भाजपकडे सादर करण्यात आला आहे. मागील निवडणुकीत ज्या जागांवर शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले होते, त्या जागांवर या वेळीही शिवसेना निवडणूक लढविणार आहे. तसेच, मागील निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या उमेदवारांची यादीही भाजपकडे पाठविण्यात आली आहे. युतीचा निर्णय झाला नाही, तर शिवसेना स्वबळावर निवडणूक लढवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. एकूणच, उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीही उमेदवारांची नावे गुप्त ठेवत पक्षांकडून आखलेली ही रणनीती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत चुरस वाढवणारी ठरणार आहे.

# शिरुरमध्ये सापडलं तब्बल २५ कोटींचं ड्रग्स, पोलीस कर्मचाऱ्याने ड्रग्स पुरवल्याची आरोपीची माहिती

पुणे । प्रतिनिधी

ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पुणे जिल्ह्यातील शिरुरमध्ये तब्बल २५ कोटी रुपयांचे ड्रग्स पुणे पोलिसांनी पकडले आहे.



यातील प्रमुख आरोपीने अहिल्यानगरमधील एका पोलिस कर्मचाऱ्याने त्याला ड्रग्स पुरवल्याची माहिती दिली आहे. याच मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकारे जर पोलिसांकडूनच ड्रग्समाफीयांना साथ दिली जात असेल तर राज्यासाठी नक्कीच ही धोक्याची घंटा मानावी लागेल असं रोहित पवार म्हणालेत. तसेच या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. १८ तारखेला रात्री उशिरा पुणे ग्रामीण पोलिसांनी शिरुरमधील एका गॅरेज चालकाकडे तब्बल २ कोटींपेक्षा जास्त किमतीचे एक किलो मेफेड्रॉन तर इतर दोघांकडे ९ किलो असे एकूण तब्बल २५ कोटींचे ड्रग्स पुणे पोलिसांनी पकडले आहे. यातील प्रमुख आरोपीने अहिल्यानगरमधील एका पोलिस कर्मचाऱ्याने त्याला ड्रग्स पुरवल्याची माहिती दिली आहे. त्यामुळं सापडलेले ड्रग्स हे अहिल्यानगर नार्कोटिक्स गोडाऊनमधील असल्याचा संशय निर्माण होत आहे. याच प्रकरणात काल अहिल्यानगरमधील डउइ शाखेतील नार्कोटिक टेबल सांभाळणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अशा प्रकारे जर पोलिसांकडूनच ड्रग्समाफीयांना साथ दिली जात असेल तर राज्यासाठी नक्कीच ही धोक्याची घंटा मानावी लागेल. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करुन पोलिसांच्या प्रतिमेला डाग लावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, ही विनंती रोहित पवार यांनी केली आहे.

# 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली महिलेला पावणेपाच कोटींचा गंडा

पुणे । प्रतिनिधी

'तुमच्या बँक खात्यांचा वापर मनी लाँड्रिंगसाठी झाला आहे. तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात आले आहे,' असा बनाव रचून सायबर चोरट्यांनी कोंढवा परिसरातील एका महिलेची चार कोटी ८२ लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांनी १८ डिसेंबर रोजी पोलिस अधिकारी असल्याचे भासवीत कोंढवा परिसरातील एका महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधला. आधार कार्डचा गैरवापर करून विविध राज्यांत बँक खाती उघडण्यात आली आहेत. या खात्यांचा मनी लाँड्रिंगच्या व्यवहारात वापर झाल्याचे महिलेस सांगण्यात आले. चौकशीच्या नावाखाली महिलेला 'डिजिटल अरेस्ट' केल्याचे भासवून अटक टाळण्यासाठी खात्यात पैसे भरण्यास सांगितले.अटक होण्याच्या भीतीपोटी महिलेने चोरट्यांनी दिलेल्या विविध खात्यांमध्ये वेळोवेळी रक्कम जमा केली. एकूण चार कोटी ८२ लाख १४ हजार रुपये हस्तांतरित झाल्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने १९ जानेवारी रोजी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

डिजिटल अरेस्ट' होत नाही

फोन, व्हिडिओ कॉल किंवा ऑनलाइन माध्यमातून अटक (डिजिटल अरेस्ट) केल्याचा खोटा आभास निर्माण केला जातो. केंद्रीय तपास यंत्रणा किंवा पोलिसांकडून 'डिजिटल अरेस्ट'सारखी कोणतीही कारवाई केली जात नाही. पोलिस किंवा केंद्रीय तपास यंत्रणा कधीही फोनवरून किंवा ऑनलाइन अटक करीत नाहीत. कोणतीही चौकशी किंवा अटक लेखी नोटीस किंवा प्रत्यक्ष कारवाईनेच होते. 'डिजिटल अरेस्ट' सांगून पैसे मागितल्यास तो नक्कीच सायबर गुन्हा आहे. अशी भीती दाखवून कोणी पैसे मागितल्यास नागरिकांनी तत्काळ सायबर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बारामतीत उमेदवार यादी जाहीर; जिल्हा परिषद निवडणुकीत राजकीय गणिते बदलली

बारामती । प्रतिनिधी

अनेक दिवसांपासून उत्सुकता असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी बुधवारी (ता. २१) आपले पत्ते खुले केले. बारामतीतील राजकीय गणितेच बदलल्याची चिन्हे या निवडणूकीत समोर येणार आहेत. राष्ट्रवादीने पंचायत समितीच्या दोन जागा भाजपसाठी सोडून दिल्याची चर्चा होती.

मिळालेल्या माहितीनुसार शिर्सुफळ गणात भाजप नेते बाळासाहेब गावडे यांचे चिरंजिव अनिकेत गावडे यांनी कमळाच्या चिन्हावर तर सुपे गणात उज्वला पोपट खैरे यांनीही कमळाच्या चिन्हावर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या दोन्ही गणात राष्ट्रवादीने कोणत्याही उमेदवाराला अधिकृत एबी फॉर्मच दिला नसल्याने या दोन्ही जागांवर राष्ट्रवादीने भाजपला बाय दिला आहे का अशी चर्चा बारामतीत सुरु झाली. दरम्यान छाननीनंतर राष्ट्रवादी या दोन गणात दोन उमेदवारांना पुरस्कृत करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी दिग्दर्शकांचा मनमोकळा संवाद

पुणे: काही नवे, काही जुने दिग्दर्शक एकत्र आले आणि त्यांनी उलगडल्या त्यांच्या मराठी चित्रपटनिर्मितीमागील कथा. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मंगळवारी (दि. २०) मराठी चित्रपट स्पर्धेतील दाखविण्यात आलेल्या मराठी चित्रपटाच्या दिग्दर्शकांनी चित्रपटनिर्मितीची कथा उलगडली. या कार्यक्रमाला चित्रपटप्रेमींनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रमेश मोरे (आदिशेष), मोहित टाकळकर (तो, ती आणि फुजी), जिजीविषा काळे (तिघी), रवींद्र माणिक जाधव (जीव), संतोष डावखर (गोंधळ), मनोज नाईक साठम (गमन) आणि समीर तिवारी (बाप्या) यांनी दिग्दर्शकांबरोबर 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे यांनी संवाद साधला.

'तिघी' या चित्रपटाच्या दिग्दर्शिका जिजीविषा काळे म्हणाल्या, माझा प्रवास 'वजनदार' या चित्रपटात सहाय्यक म्हणून सुरू झाला. आता १२ वर्षांनी माझा दिग्दर्शक म्हणून चित्रपट येतोय. पालकांची मी एकुलती एक मुलगी असल्याने मला सतत एकटे वाटत आले आणि तीच गोष्ट मी माझ्या चित्रपटातून मांडली आहे. 'तो, ती आणि फुजी', या चित्रपटाचे दिग्दर्शक मोहित टाकळकर म्हणाले, मी पूर्वीपासून




नाटकांमध्ये काम केले. पण, चित्रपट तयार करण्याचा विचार मनात सतत घोळत होता. त्यातून मग पुढे चित्रपट कण्याचा निर्णय घेतला. शहरी जीवनात नात्यांमध्ये बदल घडतात, तेच मी माझ्या आताच्या चित्रपटात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'जीव'चे दिग्दर्शक रवींद्र माणिक जाधव म्हणाले, धुळ्यात शिक्षक म्हणून मी काम करतो. मात्र, चित्रपट करण्याचा विचार मनात होता आणि त्यातून मी २०१३ रोजी पहिला माहितीपट तयार केला. हँडी कॅमेराद्वारे माहितीपट तयार केले. चित्रपट कसा तयार करायचा हे माहीत नव्हते. पुढे चित्रपट निर्मितीकडे वळलो.

'गमन'चे दिग्दर्शक मनोज नाईक साटम म्हणाले, मी छायाचित्रकार असल्याने वेडिंग शूट करायचो. तेव्हा व्हिडीओ शूटिंगबद्दल शिकलो आणि त्यातून चित्रपट तयार करण्याचा विचार मनात आला. एक कथा डोक्यात होती, ती लिहिली त्याची पुढे कादंबरी झाली. ती २०१५ मध्ये प्रसिद्ध झाली आणि उमेद आली. त्याचाच पुढे चित्रपट झाला. 'बाप्या'चे दिग्दर्शक समीर तिवारी, 'आदिशेष'चे दिग्दर्शक रमेश मोरे, 'गोंधळ'चे दिग्दर्शक संतोष डावखर यांनीही त्यांच्या चित्रपटनिर्मितीबद्दल सांगितले.

# फ्लेक्स लावणारे नगरसेवक पदापासून राहणार दूर; केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा इशारा

पुणे : शहरात अनधिकृत फ्लेक्स लावून शहर घाण करू नयेत असे आदेश भाजपतर्फे नगरसेवकांना देण्यात आले आहेत, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. त्यावर जे नगरसेवक अनधिकृत फ्लेक्स लावत आहेत, त्यांना पद न देण्याबाबत विचार करणार का? असे विचारले असता, ''पक्षाचा आदेश डावलून फ्लेक्स लावणाऱ्यांचा पक्ष गांभीर्याने विचार करेल, असा इशारा मोहोळ यांनी दिला. तसेच पुणेकरांना दिलेला शब्द आम्ही पाळणार आहोत. शहरातील सर्व अनधिकृत फ्लेक्स काढून संबंधितांवर कारवाईचे आदेश आयुक्तांना दिले आहेत, असे मोहोळ यांनी सांगितले.

पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजित वार्तालापात मुरलीधर मोहोळ बोलत होते. संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले यावेळी उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, ''पुणे शहर फ्लेक्समुक्त करू असे आश्वासन आम्ही नागरिकांना दिले आहे. या आश्वासनाची पूर्ती आमच्याकडून केली जाईल. शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत फ्लेक्स लागले आहेत.



त्यावर कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांना देण्यात आले आहेत. महापालिका निवडणुकीत विरोधकांनी आमच्यावर पातळी सोडून वैयक्तीक टीका केली.

पण मतदारांना आमच्या वैयक्तीक भांडणापेक्षा तुम्ही आम्हाला काय देणार? हे महत्त्वाचे होते. त्यामुळे नकारात्मक राजकारण न करता आम्ही केवळ विकासाच्या मुद्द्यावर प्रचार केला. शहराचा विकास, नवीन प्रकल्प, सुविधा यावर पुणेकरांनी आम्हाला मतदान केले. जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सुद्धा आम्ही अजित पवार यांच्यासह अन्य कोणावरही टीका टिप्पणी न करता केवळ विकासावर बोलणार आहोत. जर आमच्याकडे कागदपत्र उपलब्ध झाले तर आम्ही त्यावर नक्की बोलू असेही मोहोळ यांनी सांगितले.पुणे महापालिकेच्या निवडणुकीत ज्या कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळाली नाही त्यांचा विचार होऊ शकतो. पण याचा निर्णय वरिष्ठ पातळीवरूनच होईल. शिवसेनेसोबत आमची युती नव्हती त्यामुळे त्यांना स्वीकृत नगरसेवकपद देण्याचा विषयच नाही, असे मोहोळ यांनी स्पष्ट केले. तसेच समाविष्ट गावातील विकासासाठी तेथील नगरसेवकांनाच पद दिले पाहिजे असे नाही. शहराच्या संपूर्ण विकासासाच अजेंडा आम्ही डोळ्यासमोर ठेवून काम करत आहोत, त्यामुळे समाविष्ट गावांचाही विकास होईल

# इन्स्टाग्राम व्हिडीओवरून बारामतीत अल्पवयीनावर पिस्तुलाचा धाक, कोयत्याने हल्ला

बारामती: 'तू इन्स्टाग्रामवर अपलोड केलेल्या व्हिडीओमध्ये मी दिसत आहे, तो डिलीट करून टाक,' असे सांगत अल्पवयीन तरुणाला पिस्तुलाचा धाक दाखवत कोयत्याने मारहाण केली. याप्रकरणी बारामती तालुका पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गंभीर मारहाणीसह शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना दि. १६ रोजी रात्री ८ वाजता तांदूळवाडीतील भैरवनाथ मंदिरामागे घडली.

तांदूळवाडीत राहणाऱ्या एका १७ वर्षीय मुलाने याबाबत फिर्याद दिली. त्यानुसार सार्थक लक्ष्मण अंबुरे, आकाश धनंजय अंबुरे, बापू गौतम अंबुरे, पोपट गौतम अंबुरे, लखन अशोक अंबुरे (सर्व रा. तांदूळवाडी, बारामती) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.या



घटनेत संबंधित अल्पवयीन मुलगा गंभीर जखमी झाला आहे. तांदूळवाडीत आलेल्या बाळूमामाच्या पालखीचा व्हिडीओ फिर्यादीने काढून तो इन्स्टाग्रामवर अपलोड केला होता. त्यानंतर रात्री ८ वाजता भैरवनाथ मंदिराकडे तो जात असताना सार्थक अंबुरेने त्याला बाजूला बोलावले. इन्स्टाग्रामवर टाकलेल्या व्हिडीओत मी दिसतो आहे, तो व्हिडीओ डिलीट कर, असे त्याने सांगितले.त्यावर मी मुद्दामहून केलेले नाही, गर्दीमुळे व्हिडीओत तू आलेला आहे, असे फिर्यादीने सांगण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी आकाश, बापू, पोपट व लखन हे त्याच्याजवळ आले. त्यापैकी आकाश याने तू लय बोलतोय का? असे म्हणत त्याच्याकडील पिस्तूल काढून दाखवून तुला बघायचंय का? अशी धमकी दिली.

त्या वेळी सार्थकने पाठीमागून डोक्यात कोयता मारून गंभीर दुखापत केली. बापू, पोपट, लखन यांनी खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सार्थक व आकाश यांनी तू जर घरी काही सांगितले किंवा पोलिसात तक्रार दिली तर तुला व तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. जखमी फिर्यादीला तेथे जमलेल्या लोकांनी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी नेले. त्यानंतर फिर्यादीने ही बाब घरी सांगत पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

# भूकरमापक परिक्षेचा निकाल ३० जानेवारीला होणार प्रसिद्ध

पुणे : राज्य शासनाच्या भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गातील ९०३ पदांसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल ३० जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात



येणार आहे. भूमि अभिलेख विभागाच्या महाभूमि या संकेतस्थळावर हा निकाल उमेदवारांना पाहता येणार आहे, अशी माहिती जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली.

भूकरमापक पदाच्या भरतीसाठी ३४ हजार ५३२ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी ३० हजार ६५६ उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली. ही परिक्षा १३ नोव्हेंबर २०२५ आणि १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत प्रति दिन दोन सत्रांमध्ये घेण्यात आली.पुणे विभागात भूकरमापकांची ८३ पदे असून त्यासाठी २ हजार ९७३ इतक्या उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली. कोकण विभागातील २५९ जागांसाठी ८ हजार १४८ उमेदवारांनी, नाशिक विभागातील १२४ जागांसाठी ४ हजार ३४० उमेदवारांनी परिक्षा दिली. तर छत्रपती संभाजीनगर विभागातील २१० जागांसाठी ८ हजार २७६ उमेदवारांनी तर, अमरावती विभागातील ११७ जागांसाठी ३ हजार ६७९ उमेदवारांनी अणि नागपूर विभागातील ११० जागांसाठी ३ हजार २४० उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा दिली आहे.ऑनलाईन परिक्षेस उपस्थित सर्व उमेदवारांचा विभागनिहाय गुणानुक्रमे निकला .३० जानेवारी २०२६ रोजी संकेतस्थळावर तसेच संबधित उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे भूमि अभिलेख विभागाकडून सांगण्यात आले.

# राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तृप्ती सरोदे यांचा शिवसेनेत प्रवेश

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर ग्रामीण-न्हावरे गटात उमेदवारी नाकारल्याने नाराज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नेत्या तृप्ती सरोदे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. निवडणुकीच्या तोंडावर 'धनुष्यबाण' हाती घेतल्याने राष्ट्रवादीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

तृप्ती सरोदे या गेल्या अनेक महिन्यांपासून या गटात सक्रिय होत्या. जनसंपर्क आणि स्थानिक प्रश्नांवरील आक्रमक भूमिकेमुळे त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात होती. मात्र, ऐनवेळी पक्षाने त्यांना डावलून वेगळा चेहरा समोर आणल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि निष्ठावंतांऐवजी धनशक्तीला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप सरोदे समर्थकांनी केला आहे.प्रामाणिक कामाची जिथे किंमत नाही, तिथे राहण्यात अर्थ नाही, अशी रोखठोक भूमिका घेत सरोदे यांनी शिवसेनेची वाट धरली. यावेळी शिवसेनेकडून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सामान्य कार्यकर्त्याला न्याय देणारा पक्ष म्हणून आपण शिवसेनेत येत असल्याचे त्यांनी नमूद केले.सरोदे यांच्या या बंडखोरीमुळे शिरूरमधील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. त्यांचा तळागाळातील संपर्क आणि नाराज कार्यकर्त्यांची फळी यामुळे राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवारासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. आता या मतदारसंघात 'घड्याळ' की 'धनुष्यबाण' वरचढ ठरणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# शुल्कवाढीचा चेंडू नव्या कारभाऱ्यांच्या कोर्टात; जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमानुसार नवीन दराचा निर्णय

पुणे - महापालिकेकडून जाहिरात फलकांसाठी केलेली शुल्कवाढ योग्यच असल्याचा निकाल न्यायालयाने दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील जाहिरात फलकांचे परवाना शुल्क सुधारित करण्याचा निर्णय घेतला आहे. जाहिरात फलक नियमन व नियंत्रण नियमानुसार नवीन दर निश्चित केले आहेत. याबाबतचे तीन प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मुख्य सभेसमोर मांडले होते.

आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या प्रस्तावांना स्थायी समितीची मान्यता मिळाली होती. मात्र, मुख्य सभेची अंतिम मान्यता मिळू शकली नव्हती. त्यामुळे सोमवारी झालेल्या मुख्य सभेत हे तिन्ही प्रस्ताव पुन्हा मांडण्यात आले. मात्र प्रशासकांनी या प्रस्तावांवर निर्णय न घेता विषय एक महिना पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे आता नव्या नगरसेवकांची मुख्य सभा या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेणार आहे. या निर्णयामुळे शहरातील होर्डिंगधारकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी हा निर्णय आता नव्या नगसेवकांना घ्यावा लागणार आहे.प्रस्तावात शहरात सार्वजनिक जागांवर अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या बोर्ड, बॅनर, फ्लेक्स आदींवर सध्या क्षेत्रीय कार्यालयांमार्फत दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई केली जाते. यासाठी आतापर्यंत अनधिकृत फ्लेक्ससाठी १ हजार रुपये दंड आणि जाहिरात फलक निष्कासनासाठी ५० हजार रुपये शुल्क आकारले जात होते.मात्र, त्यात मोठी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे. त्यानुसार अनधिकृत फ्लेक्ससाठी १० हजार रुपये दंड आणि निष्कासन शुल्क २ लाख रुपये करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला आहे, तसेच जाहिरातदारांसह जागा मालकांवरही कारवाई करण्यात येणार आहे. प्रस्तावानुसार शहरातील जाहिरात फलकांचे परवाना शुल्क वाढविण्यात येणार आहे.सध्या २२२ रुपये प्रति चौरस फूट असलेला दर वाढवून २०२३ ते २०२६ या कालावधीसाठी ५८० रुपये आणि २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी ७०० रुपये प्रतिचौरस फूट असा दर निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावालाही स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे.मात्र, आचारसंहिता लागू झाल्याने या धोरणांना मुख्य सभेची मान्यता मिळू शकली नव्हती. कालच्या बैठकीतही कोणताही अंतिम निर्णय न घेता हे सर्व प्रस्ताव पुढील महिन्यासाठी तहकूब करण्यात आले आहेत.